गुरुवार, १ जून २०२३
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -२६२
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ● THURSDAY 1 June 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-262 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-5



खंडोबा मल्हारगडाच्या शिल्पकार पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त जेजुरी येथील गावकरी, मानकरी, खांदेकरी आणि वंन्दे मातरम, व्यसन मुक्ती संघटनेच्या वतीने खंडोबा गडावरील देशातील उंच अशा अहिल्यादेवी पुतळ्यास बेलभंडारा, पुष्प उधळून अभिवादन करण्यात आले. छायाचित्र : विजयकुमार हरिश्चंद्रे

# डॉ. लहानेंसह नऊ डॉक्टरांचे राजीनामे

## अधिष्ठाता वर्षभरापासून मानसिक त्रास देत असल्याची तक्रार

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : प्रसिद्ध अशा जे. जे. रुग्णालयात विविध पदावर काम करणाऱ्या वरिष्ठ डॉक्टरांनी अचानक आपल्या पदाचे राजीनामे दिले आहेत. विशेष म्हणजे यामध्ये ज्येष्ठ डॉ. तात्याराव लहाने यांचादेखील समावेश आहे. डॉ. तात्याराव लहाने, रागिणी पारेख यांच्यासहित नऊ जणांनी राजीनामे दिल्याची माहिती टीव्ही 9 या मराठी वाहिनीने दिली आहे. या सर्व वरिष्ठ डॉक्टरांनी जे.जे. रुग्णालयाच्या अधिष्ठातांवर गंभीर आरोप केले आहेत.**

जे.जे. रुग्णालयाचे अधिष्ठाता आपल्याला वर्षभरापासून मानसिक त्रास देत असल्याची तक्रार राजीनामे देणाऱ्या सर्व वरिष्ठ डॉक्टरांची आहे. संबंधित प्रकार हा अतिशय धक्कादायक मानला जात आहे. विशेष म्हणजे राजीनामा देणाऱ्या डॉक्टरांमध्ये तात्याराव लहाने यांचे नाव असल्याने हे प्रकरण गंभीर असण्याची शक्यता आहे. पण दोन्ही बाजूच्या भूमिका समजून घेतल्याशिवाय संबंधित प्रकरणावर निष्कर्ष काढता येणार नाही. जे जे रुग्णलयातील ज्येष्ठ डॉक्टरांनी एक प्रसिद्ध पत्रक जारी करत राजीनामा देण्यामागील कारण सांगितले आहे.

राजीनामा देणाऱ्या लहाने आणि इतर 8 डॉक्टरांनी एक प्रसिद्धीपत्रक काढून त्यात संपूर्ण घटनाक्रम मांडलाय. सेवानिवृत्तीनंतरही काम करणाऱ्या तात्याराव लहाने यांचे वेतन अधिष्ठातांनी अदा केले नसून लहाने यांना शासकीय निवासस्थान रिक्त करायला सांगून 7 लाख रुपये दंड ठोठावला, असे पत्रकात म्हटले आहे. निवासी डॉक्टरांना आमच्याविरोधात भडकावले जात असून त्यांना भडकवण्यात जे.जे. च्या डिन सहभागी असल्याचे तात्याराव लहाने यांनी म्हटले आहे. वरिष्ठ डॉक्टरांनी प्रसिद्ध पत्रक काढत याबाबत सविस्तर भूमिका मांडली आहे. गेल्या काही दिवसांपासून




निवासी डॉक्टर संघटना (मार्ड)ने अनेक प्रसिद्धी पत्रके जारी केली आहेत. नेत्र विभागातील प्रथम आणि द्वितीय वर्षाच्या निवासी डॉक्टरांनी केलेल्या तक्रारीचे आम्ही शासनास मुद्देनिहाय उत्तर दिलेले आहे.

1995 पूर्वी रोज फक्त 30 रुग्ण येणाऱ्या या विभागात आज 300 ते 400 रुग्ण दररोज येतात. या विभागाच्या कामाची दखल घेऊन केंद्र शासनाने 2008 मध्ये विभागास 'विभागीय नेत्रचिकित्सा संस्थेचा' दर्जा दिला. या विभागात महाराष्ट्रभरातून आणि इतर राज्यातून रुग्ण उपचार घेण्यासाठी येतात. डोळ्यांमधील दुर्धर आजार किंवा शस्त्रक्रियेनंतर गुंतागुंत निर्माण झालेले रुग्ण शेवटची अपेक्षा घेऊन आत्मविश्वासाने या विभागात उपचारासाठी येतात. या विभागात वेगेवेगळ्या अतिविशोपचार सेवा दिल्या जातात. या सर्व सेवा त्या-त्या तज्ज्ञांमार्फत रुग्णांना देणारा हा महाराष्ट्रातील एकमेव विभाग आहे. तसेच सुट्टीच्या दिवशी आदिवासी आणि ग्रामीण भागात जाऊन येथील नेत्रतज्ज्ञ गरीब रुग्णांची सेवा करत आहेत. मागील 28 वर्षात 692 शिबीरे घेऊन 30 लाख रुग्णांवर उपचार केले आहेत.

# अहमदनगरचे नाव 'अहिल्यादेवी होळकर नगर' होणार

आधुनिक केसरी न्यूज

**अहमदनगर :** पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर यांचे जन्मस्थान असलेल्या अहमदनगर येथील चौंडी येथे आज आहिल्यादेवी होळकर यांच्या २९८ व्या जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हजर आहेत. या कार्यक्रमात बोलताना फडणवीस यांनी अहमदनगर जिल्ह्याचे नाव आहिल्यादेवी होळकर नगर असे व्हावे ही इच्छा व्यक्त केली. त्यापाठोपाठ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लगेच त्यांच्या भाषणात घोषणा केली की, सर्वांची इच्छा आहे, त्यामुळे अहमदनगरचे नाव बदलून आहिल्यादेवी होळकर नगर केले जाणार आहे. याबाबतचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाने घेतला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, आहिल्यादेवींचे माहेरचे आडनाव शिंदे आहे आणि मी पण शिंदेच आहे. आज येथे रामभाऊ शिंदे आणि गोपीचंद पडळकर यांनी मागणी मांडली. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि माझीही तीच इच्छा आहे. तसेच तुमच्या सर्वांच्या इच्छेखातर अहमदनगर जिल्ह्याचे नाव आहिल्यादेवी होळकर नगर असे करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे.

# मान्सूनचे सात ते आठ दिवस उशिराने आगमन

## भारतीय हवामान विभागाने वर्तवला अंदाज; यंदा 96 टक्के पाऊस पडणार

आधुनिक केसरी न्यूज


**मुंबई :** उन्हामुळे जीवाची लाहीलाही होत असताना दुसरीकडे सगळ्यांना मान्सूनचे वेध लागले आहेत. मान्सूनच्या आगमनाबाबत हवामान खात्याने महत्त्वाची माहिती दिली आहे. मान्सूनने अंदमान आणि निकोबारची संपूर्ण बेटे व्यापली आहेत. केरळमध्ये मान्सून दाखल होण्यास काही दिवस लागणार आहेत. दरवर्षी केरळमध्ये मान्सून एक जून रोजी दाखल होतो. यंदा मात्र केरळमध्ये मान्सून दाखल होण्यास 4 जून ते पाच जून उजाडणार असल्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. बंगालच्या उपसागराचा आणखी काही भाग येत्या दोन-तीन दिवसात मान्सूनने व्यापणार असल्याचा भारतीय हवामान विभागाने अंदाज वर्तवला आहे. यावर्षी मान्सून हा सात ते आठ दिवस संथ गतीने सुरू आहे. सध्या मान्सून अंदमान निकोबार बेटे पार करुन बंगालच्या उपसागरात आहे. केरळच्या भूमीवर पोहचायला मान्सूनला चार किंवा पाच जून उजाडणार असल्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. दरवर्षीच मान्सून 1 जूनला केरळात पोहोचतो. आता, मात्र काही दिवस मान्सून लांबणीवर पडला आहे.

महाराष्ट्रात मान्सून कधी दाखल होणार, याबाबत आताच अंदाज व्यक्त करता येणार नाही. केरळपासून मान्सूनची प्रगती कशी होते यावर, मान्सून महाराष्ट्रात कधी दाखल होईल, हे निश्चित होणार आहे. यावर्षी मान्सून उशीर येत असला तरी तो सर्वसाधारण जेवढा पाऊस देतो तेवढ्याच प्रमाणात पाऊस पडणार असल्याचे म्हटले जात आहे. यंदा 96 टक्के पावसाचा अंदाज आहे.



जूनमधे सरासरीच्या कमी पाऊस पडणार असल्याची शक्यता आहे. जूनमध्ये उष्णतेची लाट येण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. बंगालच्या उपसागरात आलेल्या मोचा चक्रीवादळामुळे मान्सूनची प्रगती संथ गतीने सुरू असल्याची माहिती आहे. मान्सूनच्या दोन शाखा आहेत. एक बंगालच्या उपसागरातून येते आणि दुसरी अरबी समुद्रातून येते. बंगालच्या उपसागरातून येणारा मान्सून संथ गतीने पुढं सरकत आहे. तर, अरबी समुद्रातुन येणाऱ्या शाखेसाठी अजून पोषक वातावरण तयार झालेले नाही.

खरीप हंगाम पारंपारिकपणे जून ते ऑक्टोबर या कालावधीत असतो आणि साधारणपणे 1 जून रोजी केरळमध्ये नैऋत्य मोसमी पाऊस सुरू झाल्यानंतर पहिल्या पावसाच्या सुरुवातीला पेरणी केली जाते.





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

'फिटे अंधाराचे जाळे...' या गीतात म्हटल्याप्रमाणे अंधाराचे जाळे नाहीसे होऊन स्वच्छ दिवस उजाडलेला असतो. अशा वेळी परमेश्वर म्हणा की निसर्ग म्हणा मानवाला, पशुपक्ष्याना आणि अवघ्या सृष्टीला जणू म्हणतो, ' बघ, तुझ्यासाठी एक अख्खा सुंदर दिवस घेऊन आलो आहे. आता त्याचा कसा वापर करायचा ते तू ठरव. ' पहाटेच्या वेळा वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या भासतात. पण मला सगळ्यात जास्त आवडते ती जंगलातील पहाट. या पहाटेसारखी सुंदर वेळच नाही. रात्र संपून दिवस उगवण्याच्या सीमारेषेवर ही पहाट उभी असते. अशा वेळी निसर्गाचं सौंदर्य अनुभवावं. रात्र संपून पहाट होतानाची वेळ इतकी सुंदर असते की अशा वेळी शहरातले भगभगीत दिवे नकोसे वाटतात. पहाटेला तिच्या नैसर्गिक रूपातच पाहावं, फुलू द्यावं, खुलू द्यावं. आकाशातल्या रात्रीच्या मुक्कामाला असणाऱ्या तारे आणि तारका आपल्या घरी हळूहळू परत जायला निघालेल्या असतात. हळूहळू त्या दृष्टीआड होतात. त्यांना अदृश्य होताना आणि पहाटवेळा उमलताना पाहण्यात एक वेगळाच अनोखा आनंद आहे. तो अनुभवावा. पहाट मला एखाद्या अल्लड तरुणीसारखी भासते. कोणत्याही प्रकारचा साजशृंगार न करता ती आपल्या नैसर्गिक रूपातच येते. तिचं हे नैसर्गिक रूपच मनाला जास्त भावतं. जातीच्या सुंदराला जसं सगळंच शोभून दिसतं, तशीच ही पहाट असते. रम्य, देखणी. अशा वेळी जंगलातून एखादा फेरफटका मारावा. निसर्गाची भूपाळी अनुभवावी. रंग, रूप, रस, गंध सगळं सगळं असतं त्यात. फक्त ती अनुभवता आली पाहिजे. निसर्ग वेगवेगळ्या रूपात आपल्याशी बोलत असतो पण ते ऐकता आलं पाहिजे, अनुभवता आलं पाहिजे. त्यासाठी सुद्धा काही साधना आवश्यक असते. सगळ्या कवींना, महाकवींना, लेखकांना या पहाटेनं स्फूर्ती दिली आहे. अनेक सुंदर काव्य पहाटेच्या मंगल वेळेनं प्रसवली आहेत. अनेक ऋषी मुनी, लेखक, कवी यांना प्रतिभेचं देणं या पहाटेनच दिलं आहे. आपल्या घराजवळ एखादा डोंगर किंवा एखादी टेकडी असेल तर पहाटे जरूर जावं. नसेल तर कधीतरी मुद्दाम वेळ काढून अशा ठिकाणी जावं. ही पहाट अनुभवावी. ही पहाट अनुभवण्यासाठी सध्या तरी कोणतंच शुल्क आकारलं जात नाही. काही चांगल्या गोष्टी अजूनही मोफत मिळतात. त्यातील पहाट, पहाटेचा गार वारा, नयनरम्य निसर्ग आपल्याकडून काही घेत नाही. देतो मात्र भरभरून ! ' आपल्याला ते घेता आलं पाहिजे. नाहीतर ' देणाऱ्याचे हात हजारो, दुबळी माझी झोळी अशी अवस्था व्हायची ! '



## आनंदी पहाट

# मैत्रीच्या नात्याला दुधाची गोडी असावी

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

आपल्या आयुष्यांत अनेक घडामोडी घडत असतात. कितीतरी लोक आपल्या आयुष्यांत येतात आणि जातात. पण सगळ्यांत अधिक लक्षात कोण रहात असेल तर, ते म्हणजे सगे-सोबती अर्थात आपले मित्र-मैत्रिणी. अगदी बालपणीच्या मित्र-मैत्रिणींची नावेही त्यांच्या स्वभावासहित लक्षात राहतात. अर्थात हे सगे-सोबती आपल्या आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर आपल्याला भेटत असतात. पदोपदी आपण आपल्या आयुष्याची नवनवीन रांगोळी काढत असतो आणि त्यांत विविध रंग भरण्याचे काम आपले सगे-सोबतीच करत असतात. प्रसंगी आपले मन मोकळे करण्याची एक सुरक्षित जागा सुद्धा मित्र-मैत्रिणींपैकीच असते. आपल्या चुका हक्काने दाखवणे असेल अथवा आपले कौतुक करणे असेल, मित्रमंडळी शिवाय ह्यात सहसा पुढाकार इतर कोणी घेत नाही. थट्टा मस्करी करून आणि विनोद सांगून डोळ्यांत पाणी येईपर्यंत हसवणाऱ्या मित्रमंडळी शिवाय आपल्याला मनाने अधिक जवळ फारसे कोणी नसते. मैत्रीचे नाते अगदी दुध-पाण्यासारखे असते. दोन्ही एकत्र केले कि ते वेगळे करता येत नाही. आपल्या मित्र-मैत्रिणी निवडताना आत्मनिष्ठता असणे गरजेचे असते. आपला सर्जनशील विचार नेहमीच आपल्या मित्र-मैत्रिणींच्या निवडीमध्ये नेमकेपणाने निर्णय घेण्यास उद्युक्त करत असतो. आपल्या प्रत्येक निवडीच्या संदर्भातील सर्व संभ्रम दूर करण्याचे काम याद्वारे होऊ शकते. आपला स्वतःकडे आणि इतरांकडे बघण्याचा दृष्टीकोन कशा प्रकारचा आहे, हे आत्मपरीक्षणाच्या माध्यमातून समजून घेणे महत्वाचे आणि म्हणूनच आवश्यक असते. अनेकदा आपला दृष्टीकोन जितका महत्वाचा असतो तितकेच ती दृष्टी कोण देते, ते देखील तितकेच महत्वाचे असते. शालेय आणि महाविद्यालयीन शिक्षणाबरोबर मुलांना संगत निरनिराळ्या पद्धतीने घडवत असते; त्यामुळे आपल्या संगतीतील माणसे किंवा मुले कोणत्या गुणांची आहेत, हे अगोदर प्रत्येकाने पाहिले पाहिजे, तशी जाणीव प्रत्येकाला झालीच पाहिजे.



आधुनिक केसरी

## अनाहत टाळी | मनी वाजे ||

प्रेमरूप भक्ती | भक्तीरूप श्वास ||
देही ह्या निवास | आत्माराम ||१||
मोजू नये कधी | केले कर्म फळ ||
मनी जप माळ | कर्तव्याची ||२||
वांझोटीचा पान्हा | बाळा कैसा लाभे ||
दांभिका न शोभे | भक्तीभाव ||३||
अंतरीच्या खुणा | जाणी भाग्यवंत ||
भक्त निष्ठावंत | कर्मयोगी ||४||
चरणाची धूळ | लाविता कपाळी ||
अनाहत टाळी | मनी वाजे ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरूपण

आधुनिक केसरी



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

विशालनेत्रसम्राज्ञीं धनुभ्रुवौसुशोभिताम्|
तापत्रयविनाशाय दुर्गां देवीं नमाम्यहम्||
११|| विशाल नेत्रांनी जिचे सम्राज्ञीपण प्रकट होते, धनुष्याकार भुवयांनी जी सुशोभित आहे, सुंदर दिसते, अशा दुर्गा देवीला तीनही तापांच्या शांतीसाठी मी नमन करतो.

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज


बहुत कर्म जनमान्तर, कल्पान्तर बहु भोग । कर्म छुटे नहिं भोग बिनु, ज्ञान दग्ध क्रिय भोग ।।०९।।(स्वर्वेद द्वितीय मण्डल सप्तम अध्याय) ०२/०७/०९

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :

जीव अनेकानेक कर्मांना जन्मजन्मांतर आणि कल्पांतरापर्यंत भोगतो. भोगल्याशिवाय कर्म सुटू शकत नाही. योगाग्नित ज्ञानाद्वारेच कर्म भोग नष्ट होतात.

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## काव्य-चरितावली



पुष्प २९वे

आधुनिक केसरी

श्री महाराज शेतात असतांना
एक गवळी नित्य दर्शन घेई
तो बागेत ही रोज दर्शना येई
श्रीमहाराजांना गाईचे दूध देई ।।
मोठा निष्ठांवान होता हा गवळी
श्री गुरूंच्या परीक्षेत पास झाला
इंदोरच्या शिष्य परिवारात हाच
शिष्य पहिल्या नंबरचा ठरला ।।
इनामदार पत्नी नाव जिजीबाई
मोठाच धाक हिचा घरादाराला
बागेत आलेल्या श्रीमहाराजांना
पाहून म्हणे-इथे बैरागी कशाला ? ।।
घेईन मी आता परीक्षाच याची
माझ्या परिक्षेत जर पास झाला
जाईन मी नमस्कार करायला
ऐकुनी इनामदार गप्प झाला ।।
म्हणे अरूणदास-कथा सारी खास
भक्ताना घडवी श्रीगुरू सहवास ।।




अरुण वि. देशपांडे
संपर्क क्र. 9850177342

# थोडे वाचावे पण कृतीत आणावे

आधुनिक केसरी

खूप समजून घ्यावे, ज्ञान संपादन करावे, असा पुष्कळ लोकांना हव्यास असतो, आणि त्याच्याशिवाय त्यांना चैन पडत नाही. हे एक प्रकारचे व्यसनच आहे. अफू खाणाऱ्याला कैफ आल्याशिवाय चैन पडत नाही. थोडी अफू पचनी पडली की, कैफ येत नाही म्हणून तो आणखी अफू कैफ येईपर्यंत खातो. असे होता होता अधिकाधिक अफू पचनी पडत जाते, आणि शेवटी इतकी अफू खाण्याची वेळ येते की त्यातच त्याचा अंत होतो. ज्ञानसंपादनाच्या हव्यासाचे असेच आहे; म्हणून, थोडेच वाचून, समजून घ्यावे, आणि ते कृतीत आणावे. नाही तर जन्मभर ज्ञान संपादण्यात वेळ जातो, आणि कृती न झाल्याकारणाने पदरात काहीच पडत नाही. मनुष्याला पोटभर जेवायला पंचवीस-तीस मिनिटे पुरेशी होतात; पण जेवलेल्या अन्नाचे पचन होण्यासाठी पाचसहा तास जावे लागतात. मनुष्य एकसारखा जर खातच राहिला तर त्याला अजीर्ण होऊन तब्येत बिघडेल, आणि त्यातच त्याचा अंत होईल. म्हणून नुसते वाचीतच बसू नये. थोडेच वाचावे, पण ते कृतीत आणण्याचा प्रयत्न करावा. नुसत्या



वाचनाने किंवा विषय समजावून घेण्याने प्रगती होत नसून, ते कृतीत आणण्याने प्रगती होते. म्हणून केवळ समजावून घेण्यापेक्षा, ते कृतीत आणण्यावर भर असावा. आपले आकुंचित मन विशाल करणे, आपण स्वार्थी आहोत ते निःस्वार्थी बनणे, हेच खऱ्या वेदान्ताचे मर्म आहे. नुसत्या विचाराने तत्त्वज्ञान निश्चित होणार नाही; त्यासाठी साधना करायला पाहिजे. जग सुधारायच्या नादी लागू नका; स्वतःला सुधारा की त्या मानाने जग सुधारेलच. आपण सुधारलो नाही तर मग जग सुधारले नाहीच ! वस्तू ही सुखाचे साधन असून आपण भ्रमाने तिलाच सुखरूप मानतो. याचा परिणाम असा होतो की, वस्तूच्या सहाय्याने सुख मिळविण्याचा प्रयत्न करण्याऐवजी आपण वस्तूच जास्त जास्त मिळविण्याच्या मागे लागतो, आणि शेवटी दुःखी बनतो. कर्माला सुरुवात करताना, फळ मिळते किंवा नाही म्हणून काळजी आणि दुःख होते; कर्म करीत असताना, फळाकडे चित्त लागल्याने कर्माचे कष्ट होतात म्हणून दुःख होते; कर्म संपून, फळ मिळाले नाही तर दुःख होते; आणि फळ मिळालेच, तर त्यातून नवीन आशा उत्पन्न होऊन, फळ मिळाल्याचा आनंद ती मारून टाकते म्हणून दुःख होते. सारांश, अथपासून इतिपर्यंत दुःखच पदरात पडते. यासाठी, फळाची अपेक्षा सोडून कर्म करू लागलो की ते कर्म करीत असतानाच मनाला समाधान प्राप्त होते. म्हणून परमार्थामध्ये रोकडा व्यवहार आहे, उधारीचा नाही, असे सर्व संतांचे सांगणे आहे. **आजचे बोधवचन आहे - अधिक वाचू नका, जे काही थोडे वाचाल, त्याचे मनन करा, आणि ते कृतीत आणा.**

## निवडक सुभाषिते

आधुनिक केसरी

पुस्तकस्था तु या विद्या परहस्तगतं धनम् । कार्यकाले समुत्पन्ने न सा विद्या न तद्धनम् ॥ स्पष्टीकरण : विद्या केवळ पुस्तकात असून चालत नाही. तिच्यातला काही - महत्त्वाचा भाग तरी आपल्या स्मरणात असला पाहिजे. काही काही भाग तर तोंडपाठच असला पाहिजे. तरच ती विद्या प्रसंगी आपल्या उपयोगी पडते. धनाचेही तसेच. ते एकदा परक्याच्या हाती गेले, की आपल्या गरजेच्या वेळी आपल्या हाती येईलच असे सांगता येत नाही. तेव्हा शहाण्या माणसाने कोणत्याही प्रसंगी आपली नड भागवील इतके तरी धन संग्रही ठेवावे.

पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे



आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

गुरुवार, १ जून २०२३






# वसंत मुंडे यांना उत्कृष्ट सामाजिक पत्रकारिता पुरस्कार

## दुबईत लोकमतच्या आंतरराष्ट्रीय पुरस्कार वितरण सोहळ्यात गौरव

आधुनिक केसरी न्यूज

**दुबई : लोकमत मीडिया ग्रुपच्या वतीने आंतरराष्ट्रीय पुरस्कार सोहळ्यात दुबई येथे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबईचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांना या वर्षीचा 'एक्सलन्स इन सोशल जर्नलिझम अवार्ड' देऊन सांस्कृतिक कार्यमंत्री मा. सुधीर मुनगंटीवार, लोकमतचे प्रमुख मा. राजेंद्र दर्डा यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. महाराष्ट्रासह देशभरातील विविध क्षेत्रांतील प्रमुख मान्यवर उपस्थित होते. माध्यमक्षेत्रातून आंतरराष्ट्रीय पुरस्कारासाठी निवडलेले वसंत मुंडे हे पहिले व एकमेव आहेत.**



महाराष्ट्रासह देशभरात मराठी वृत्तपत्रातील आघाडीच्या लोकमत मिडिया समूहाचा या वर्षीचा आंतरराष्ट्रीय पुरस्कार सोहळा रविवार २८ व २९ मे रोजी दुबईतील हॉटेल ग्रँड हयात येथे सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार, लोकमतचे प्रमुख राजेंद्र दर्डा, आघाडीचा अभिनेता स्वप्निल जोशी, अभिनेत्री नुसरत भरूचा, दुबई स्पोर्ट सिटी चे अब्दुल रहमान फलकनाथ, मसाला किंग अल हिदा ग्रुपचे धनंजय दातार यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर व पुरस्कारप्राप्त मान्यवर उपस्थित होते. या वेळी मराठी पत्रकारीतेत वीस वर्षांपासून कार्यरत आणि महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या माध्यमातून पत्रकारांचे मजबूत संघटन उभे करून वृत्तपत्रांचे अर्थकारण व पत्रकारांच्या समस्या याविषयी सकारात्मक बदल करणारे, तसेच डिजिटल मिडियात, भारतातील पहिला नवीन प्रयोग करणारे व पत्रकारितेच्या माध्यमातून रचनात्मक काम उभे करणारे वसंत मुंडे यांच्या कामाची दखल घेऊन या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. लोकमतचा माध्यम क्षेत्रातील पुरस्कार मिळालेले वसंत मुंडे पहिले ठरले आहेत. प्रतिकूल परिस्थितीला हरवणाऱ्या शेतकऱ्यांच्या यशोगाथा, प्रशासकीय पातळीवर बदल घडवणाऱ्या विषयांवर त्यांनी विपुल लिखाण केले आहे. तर कोरोनात पत्रकार संघाच्या माध्यमातून सोळाशे पिशवी रक्त संकलन, ताळेबंद अडकलेल्या आणि अडचणीत सापडलेल्या पत्रकारांना विविध माध्यमातून मदत. तर आर्थिक अडचणीत सापडलेल्या वृतपत्रांनी पारंपरिक आर्थिक धोरण बदलून उत्पादन खर्चावर आधारित विक्री किंमत वाढवली पाहिजे यासाठी वृत्तपत्रांच्या अर्थकारण आणि पत्रकारांच्या समस्या या विषयावर राज्यभरात सात अधिवेशने घेऊन जनजागृती केली. यातून चारशे वृत्तपत्रांनी किमती वाढवण्याचा निर्णय घेतला. सामान्य माणसाचा लोकशाहीतील आवाज असलेली वृत्तपत्रे व पत्रकारांच्या समस्या मांडण्यासाठी वसंत मुंडे यांनी कणखर भूमिका घेतली. याची दखल घेऊन या वर्षीच्या आंतरराष्ट्रीय स्तरावरील पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. त्यामुळे त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.




## निर्मात्यांना इशारा

आधुनिक केसरी

ओटीटी प्लॅटफॉर्मवरून प्रसिद्ध होणाऱ्या चित्रपट, सीरिजमधून अनेकदा धुम्रपान, मद्यपानाची दृश्ये दाखवली जातात. यामुळे धुम्रपान आणि मद्यपान सेवनाचा प्रसार होऊ शकतो. यावर प्रतिबंध घालण्याकरता केंद्र सरकारने मोठे पाऊल उचलले आहे. ओटीटी प्लॅटफॉर्मवर तंबाखूविरोधी चेतावणी देण्याचे निर्देश केंद्र सरकारने दिले आहेत. तसे न केल्यास संबंधित निर्मात्यांवर कारवाई करण्याचा इशाराही केंद्राने दिला आहे. असा नियम पारीत करणारा भारत हा पहिला देश ठरला आहे. आज, ३१ मे रोजी जागतिक तंबाखू विरोध दिन साजरा केला जातोय. त्यापार्श्वभूमीवर केंद्र सरकारने ही अधिसूचना जारी केली आहे. माहिती आणि प्रसारण मंत्रालय आणि इतर भागधारकांशी चर्चा केल्यानंतर केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने OTT प्लॅटफॉर्मवर तंबाखूविरोधी इशाऱ्यांसाठी नवीन नियम तयार केले आहेत. ऑनलाइन सामग्रीचे प्रकाशक नवीन नियमांचे पालन करण्यात अयशस्वी झाल्यास केंद्रीय आरोग्य मंत्रालय, माहिती आणि प्रसारण मंत्रालय त्यांच्यावर कठोर कारवाई करतील, असे आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाने एका निवेदनात म्हटले आहे. मंत्रालयाने सिगारेट आणि इतर तंबाखू उत्पादने कायदा, २००४ अंतर्गत सुधारित नियम अधिसूचित केले. सिगारेट आणि इतर तंबाखू उत्पादने अधिनियम, २०२२ अंतर्गत या दुरुस्ती नियमांनुसारप्लॅटफॉर्मवर तंबाखूविरोधी चेतावणी दर्शविणे अनिवार्य केले आहे. ऑनलाइन क्युरेटेड सामग्रीचे प्रकाशक तरतुदींचे पालन करण्यात अयशस्वी ठरल्यास, आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय, माहिती आणि प्रसारण मंत्रालय आणि मंत्रालयाच्या प्रतिनिधींचा समावेश असलेली आंतर-मंत्रालय समिती इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान, स्वतःहून किंवा तक्रारीवर कारवाई करेल आणि ऑनलाइन क्युरेट केलेल्या सामग्रीच्या प्रकाशकाची ओळख पटल्यानंतर, अशा अपयशाचे स्पष्टीकरण देण्याची आणि सामग्रीमध्ये योग्य बदल करण्याची वाजवी संधी देणारी नोटीस जारी करेल, अधिसूचनेत म्हटले आहे.

## दिल्लीत एकामागून एक हत्या



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**एका १६ वर्षीय मुलीच्या निर्घृण हत्येने पुन्हा एकदा दिल्ली हादरली.दिल्लीत गेल्या वर्षी महिलांवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये ४० टक्क्यांनी वाढ झाली आहे. एनसीआरबीच्या आकडेवारीनुसार २०२१ पासून दिल्लीत दररोज सरासरी दोन मुलींवर बलात्कार होत असल्याचे समोर आले आहे. बाहेरील दिल्लीतील शाहबाद डेअरी परिसरात रविवारी (२८ मे) रात्री एका वेड्या प्रियकराने एका अल्पवयीन मुलीची रस्त्याच्या मधोमध २० हून अधिक वेळा वार करून हत्या केली... ती रस्त्यावरून जाईपर्यंत तो तिला भोसकत राहिला. ..इतकेच नाही तर यानंतर त्याने रस्त्यात पडलेल्या एका मोठ्या दगडाने तिला ठेचूनही मारले..धक्कादायक बाब म्हणजे या वेळी रस्त्याच्या मधोमध तो वेड्या मुलीवर वारंवार हल्ला करत होता. तिला जाताना रस्त्यावरचे लोक पाहत राहिले पण त्याला थांबवायची हिम्मत कोणाचीच नव्हती .**

दिल्लीत किंवा देशात घडलेली ही पहिलीच घटना नाही जेव्हा कोणीतरी वेडा, मनचला, प्रियकर रस्त्याच्या मधोमध एखाद्या मुलीला वेड्यासारखे मारत असतो.. त्याच्यावर ॲसिड फेकले जाते.. कधी त्याचे तुकडे केले जातात.. आणि काही वेळा त्याच्या चेहऱ्यावर ब्लेडने वार करण्यात येतात,हा सर्व रस्त्यावरील लोक बघतात पण कोणीही मदत करायला जात नाही.ज्यांच्या संवेदनाच बोथड झाल्या त्यांना जाग तरी येणार का ?

दिल्लीतील ज्या क्रूर पद्धतीने त्या विकृत तरुणाने हत्या केली , मुलीला चाकूने गोंदवणाऱ्या व्यक्तीला दिल्ली पोलिसांनी तडकाफडकी अटक केली. तो एसी आणि रेफ्रिजरेटर मेकॅनिक आहे.

सध्या स्थितीत निर्धास्त दिल्लीत जे घडले ते धक्कादायक आहे आणि ते दिल्ली किंवा देशासाठी नवीन नाही. काही काळापासून एकापाठोपाठ एक अशा घटना दिल्लीतून समोर येत आहेत ज्यांनी क्रौर्याची परिसीमा ओलांडली आहे. प्रत्येक वेळी या हत्यांच्या पद्धतीशेवटच्यापेक्षा भयानक आणि क्रूर असतात. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मृताचा मृतदेह रस्त्यावर आढळून आला. दोघांमध्ये प्रेमसंबंध होते, मात्र २८ मे ला त्यांच्यात भांडण झाले.

या घटनेची माहिती मिळताच दिल्ली पोलिसांनी कारवाई केली, मात्र या घटनेनंतर परत एकदा दिल्लीतील महिलांच्या सुरक्षेवर प्रश्न ऐरणीवर आला आहे. या घटनेनंतर दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी दिल्लीच्या एलजीवर निशाणा साधला आणि म्हटले की, "दिल्लीत एका अल्पवयीन मुलीची उघडपणे निर्घृण हत्या केली जाते. हे अत्यंत खेदजनक आणि दुर्दैवी आहे. गुन्हेगार बेधडक झाले आहेत , पोलिसांचा धाक राहिलेला नाही.

ते म्हणाले की एलजी साहेब, कायदा आणि सुव्यवस्था ही तुमची जबाबदारी आहे, काहीतरी करा. दिल्लीतील लोकांची सुरक्षितता सर्वात महत्वाची आहे. स्पेशल सीपी दीपेंद्र पाठक यांनी सांगितले की , बुलंदशहर येथून अटक केल्यानंतर आरोपीला दिल्लीत आणण्यात आले आहे. आरोपींना कठोरात कठोर शिक्षा व्हावी यासाठी आम्ही सर्व शक्य पुरावे गोळा करू. तर दुसरीकडे रडून रडून मुलीच्या आई-वडिलांची अवस्था



बिकट असल्याने आई-वडिलांनी मुलीला न्याय देण्याची मागणी केली आहे. आई म्हणाली की तिने साहिलला यापूर्वी कधीच पाहिले नव्हते. मुलीची हत्या करणाऱ्याला फाशी झालीच पाहिजे.

**दिल्लीतएकामागून एक हत्या**

मे २०२२ मध्ये झालेली श्रद्धा हत्याकांड तुम्हाला आठवत असेल . या हृदयद्रावक हत्येने संपूर्ण देश हादरला. आपली 'लिव्ह-इन' पार्टनर श्रद्धा वालकरची गळा आवळून हत्या केल्यानंतर, आफताब अमीन पूनावालाने तिच्या शरीराचे तुकडे करून तिचा मृतदेह कित्येक आठवडे रेफ्रिजरेटरमध्ये लपवून ठेवला.पूनावाला यांनी गेल्या वर्षी १८ मे रोजी श्रद्धा वालकरचा गळा दाबून खून केला होता. त्यानंतर त्याने तिच्या मृतदेहाचे तुकडे केले आणि दक्षिण दिल्लीतील मेहरौली येथील त्याच्या निवासस्थानी सुमारे तीन आठवडे रेफ्रिजरेटरमध्ये ठेवले. त्यानंतर त्याने मृतदेहाचे तुकडे दिल्लीच्या वेगवेगळ्या भागात फेकून दिले.

श्रद्धा हत्याकांडातून प्रेरित आणखी एक प्रकरण फेब्रुवारीमध्ये उघडकीस आले जेव्हा २४ वर्षीय साहिल गेहलोतने त्याची गर्लफ्रेंड निक्की यादवचा गळा दाबून खून केला, नंतर तिचा मृतदेह नैऋत्य दिल्लीतील उत्तम नगर येथील त्याच्या ढाब्यावर रेफ्रिजरेटरमध्ये टाकून दिला. त्याच दिवशी साहिलनेही दुसरे लग्न केले होते. दिल्लीत नवीन वर्षाच्या दिवशी अंजली सिंगच्या स्कूटरला धडक दिल्यानंतर एका कारने तिला सुलतानपुरी ते कांझावाला सुमारे १२ किलोमीटरपर्यंत ओढले. या घटनेत अंजलीचा मृत्यू झाला होता. अंजलीची स्कूटी बलेनो कारला



धडकली आणि त्यानंतर ती अनेक किमीपर्यंत ओढली गेली. त्याचे डोके गाडीच्या चाकात अडकल्याने त्याची कातडी आणि अंगावरील कपडे देखील काढले गेले. नैना साहनी आणि जेसिका लाल महिलांसोबत झालेल्या तोडफोडीच्या अशा दोन घटना ९० च्या दशकातील आहेत. एक म्हणजे १९९५ ची तंदूर घटना. जेव्हा दिल्लीत राहणाऱ्या सुशील शर्माने अवैध संबंध असल्याच्या संशयावरून पत्नी नयना साहनी हिची हत्या केली. संशय आल्याने सुशीलने पत्नीची गोळ्या झाडून हत्या केली. आणि मृतदेह लपवण्यासाठी त्याने मित्राचे हॉटेल निवडले आणि मृतदेह ओव्हनमध्ये जाळण्याचा प्रयत्न केला. मृतदेह ओव्हनमध्ये जाळण्यापूर्वी त्याने मृतदेहाचे अनेक तुकडे केले होते. तो पत्नीचा मृतदेह ओव्हनमध्ये जाळत असताना , त्या वेळी गस्तीवर असलेल्या पोलीस हवालदाराला संशय आला. आणि आत गेल्यावर त्याला नयनाच्या मृतदेहाचे तुकडे जमिनीवर पडलेले दिसले. जेसिका लालची हत्या देखील अशीच होती, २९ एप्रिल १९९९ च्या रात्री दारू न दिल्याने एका बिघडलेल्या वडिलांच्या मुलांनी तिला गोळ्या घालून ठार मारले होते. टॅमारिंड कोर्ट, मेहरौलीच्या कुतुब कॉलोनेड हवेलीच्या आत एक रेस्टॉरंट, उच्च वर्गीय समाजात ओळख असलेल्या बीना रमानी यांचे रेस्टॉरंट होते. या दिवशी एका खास पार्टीत सिद्धार्थ वशिष्ठ उर्फ मनू शर्मा आपल्या मित्रांसह यूपीचे बाहुबली नेते डीपी यादव यांचा मुलगा विकास यादव सोबत येथे पोहोचतो आणि दारू मागतो. मनू शर्मा हा हरियाणातील काँग्रेसचे प्रबळ नेते विनोद शर्मा यांचा मुलगा आहे. चार मित्र दारू मागतात, जेसिका वारंवार नकार देते आणि मग मनू शर्मा खिशातून पिस्तूल काढून जेसिकाचा खून करतो या दोन्ही प्रकरणांनी खूप गाजले आणि आजही गुन्हेगार तुरुंगाबाहेर आहेत.


प्रत्येक मुलीची सुरक्षितता महत्त्वाची आहे

डिसेंबर २०२२ मध्ये, पश्चिम दिल्लीतील द्वारका येथे दोन दुचाकीवरून आलेल्या मुलांनी शाळेत जाणाऱ्या विद्यार्थिनीच्या चेहऱ्यावर ॲसिड फेकले . त्यामुळे मुलीचा चेहरा ७-८ टक्के भाजला असून त्याचा परिणाम डोळ्यांवरही झाला आहे.या घटनेनंतर मालीवाल यांनी पुन्हा एकदा दिल्लीतील महिलांवरील वाढत्या गुन्ह्यांवर प्रश्न उपस्थित करत केंद्र सरकारवर राज्याचे निशाणा साधला.

**महिलांसाठी दिल्ली असुरक्षित**

दिल्लीत गेल्या वर्षी महिलांवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये ४० टक्क्यांनी वाढ झाली आहे. २०२० मध्ये महिलांविरोधातील गुन्ह्यांची संख्या ९,७८२ होती. जे २०२१ मध्ये १४,२७७ प्रकरणे वाढले.नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरो च्या आकडेवारीनुसार, केंद्रशासित प्रदेशांमध्ये २०२१ मध्ये दिल्लीत महिलांवरील गुन्ह्यांचे सर्वाधिक प्रमाण नोंदवले गेले आहे. गेल्या तीन वर्षांतील महिलांवरील हिंसाचाराच्या घटनांबद्दल बोलायचे झाल्यास २०१९ मधील १३,३९५ वरून २०२१ मध्ये ती १४,२७७पर्यंत वाढली आहे. एनसीआरबीच्या आकडेवारीनुसार, दिल्लीतील महिलांवरील गुन्ह्यांचे प्रमाण सर्व १९ महानगरांमधील एकूण गुन्ह्यांपैकी ३२.२० टक्के आहे. एनसीआरबीच्या आकडेवारीनुसार २०२१ मध्ये दिल्लीत दररोज सरासरी दोन मुलींवर बलात्कार झाला. पण गेल्या काही काळातील घटना आणि हत्यांनंतर, सरकारच्या वाढत्या दाव्यांखेरीज दिल्लीतील गुन्हेगारी दरात फारसा बदल झाल्याचे दिसत नाही. दिल्लीत एखादा गुन्हा किंवा खून झाला कीच सरकार आणि पोलिसांना जाग येते, असे दिसते. जेव्हा लोकांच्या डोळ्या देखत हत्या होत होती तर जनता मात्र गप्प होती,नेते गप्प होते. हत्येनंतर आता या हत्याकांडाचे राजकारण सुरू झाले असून नेते व राजकारणी सांत्वणा करण्यासाठी पीडितेच्या घरी आपली हजेरी लावत आहे.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र. : ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**३१ मे, आज पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती. आजच्याच दिवशी म्हणजे ३१ मे १७२५ रोजी अहमदनगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यातील चोंडी या गावी माणकोजी व सुशिलाबाई शिंदे या दाम्पत्यापोटी अहिल्यादेविंचा जन्म झाला. अतिशय छोट्या आणि सामान्य कुटूंबात जन्मलेल्या अहिल्यादेवी यांनी इतिहासात मानाचे स्थान प्राप्त केले आहे. ज्या काळात स्त्रियांना शिक्षणास बंदी होती, चूल आणि मूल हेच स्त्रियांचे जीवन होते, स्त्रियांनी घराचा उंबरठा ओलांडणे म्हणजे पाप समजले जात त्याकाळात त्यांच्या वडिलांनी त्यांना लिहायला, वाचायला शिकवले. मराठ्यांच्या इतिहासातील पराक्रमी समजल्या जाणाऱ्या होळकर घराण्यातील सुभेदार खंडेराव होळकर यांच्याशी वयाच्या आठव्या वर्षी त्यांचा विवाह झाला. खंडेरावांपासून त्यांना मालेराव आणि मुक्ताबाई अशी दोन अपत्ये झाली.**

पण वयाच्या अवघ्या २८ व्या वर्षी त्यांना वैधव्यास सामोरे जावे लागले. पती खंडेराव हे कुंभेरीच्या लढाईत धारातीर्थी पडल्यावर त्यावेळच्या सनातनी लोकांनी त्यांच्यावर सती जाण्यासाठी दबाव आणला पण सासरे सरदार मल्हारराव होळकर यांनी या अमानवी, सनातनी परंपरेला विरोध करून अहिल्यादेवींना सती जाण्यापासून परावृत्त केले. आपल्या सासऱ्यांच्या इच्छेनुसार त्यांनी सती जाण्याचा विचार सोडून दिला. अहिल्यादेवींची राजकीय कारकीर्द तेंव्हापासूनच सुरू झाली. खंडेरावांची जागा अहील्यादेवींनी घेतली. मल्हारराव देशभर मोहिमांवर व्यस्त असत त्यावेळी मल्हारराव आणि अहिल्यादेवींमध्ये पत्रव्यवहार होत. सासरा - सुनेमधील पत्रव्यवहार हा अहिल्यादेवींच्या राजकीय विचारकतेचा उत्कृष्ट नमुना होय.

मोहीमेवर असताना मल्हारराव प्रजा रक्षणाच्या सूचना अहिल्यादेवींना जसे देताना दिसतात तसेच अहिल्यादेवी आपल्या सासऱ्यांना देताना दिसतात. सासरा सुनेचे ऐकल असा तो काळ नव्हता....आता ही नाही...पण मल्हाररावांसारखा मुत्सद्दी अहिल्यादेवींचा सल्ला अंमलात आणत यावरुनच अहिल्यादेवींची योग्यता लक्षात येते. मल्हारराव मोहिमेवर असत तेंव्हा स्वतः अहिल्यादेवी राज्याचा बंदोबस्त चोख राखीत. मल्हाररावांच्या सूचनेप्रमाणे त्या कारभार करीत. १७६६ साली मल्हाररावांचे वृद्धापकाळाने निधन झाले. दरम्यानच्या काळात अहिल्यादेवींनी स्त्रियांना लष्करी प्रशिक्षण देणारे महाविद्यालय सुरू केले. ज्या काळात स्त्रियांना घराबाहेर पडायला बंदी होती त्याकाळात त्यांनी स्वतःची ५०० महिलांची पलटण उभी केली. अहिल्यादेवींचे प्रशासन ब्रिटिशांनाही आदर्शभूत ठरले. सर्व देशात जेंव्हा दांडगाईचे राज्य होते, कोणाचा कोणाला पायपोस नव्हता त्याकाळात सुरळीत चालणारे एकमेव राज्य म्हणजे अहिल्यादेवींचे राज्य. अहिल्यादेवी या दानशूर, कर्तृत्वत्वान, धर्मपारायण व कार्यक्षम राज्यकर्त्या म्हणून ओळखल्या जात असल्या तरी त्यांची राज्यकारभारावर प्रशासकीय पकड घट्ट होती. त्यांच्या वडिलांनी लहानपणी दिलेल्या शिकवणुकीचा आणि सासरे मल्हारराव यांनी दिलेल्या राजकीय कारभाराच्या तालमीचा त्यांना उपयोग झाला. त्या सामान्य कुटुंबातील असल्यामुळे त्यांना प्रजेच्या अडीअडचणीची जाणीव होती. त्यांचे राहणे अतिशय साधे व सात्विक होते म्हणूनच त्यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर असे नाव पडले.

अहिल्यादेवींनी देशभर भ्रमंती केली. देशभ्रमण करताना तिर्थक्षेत्रांच्या जागी त्यांनी धर्मशाळा बांधल्या. शेकडो मंदिरांचा जिर्णोद्धार केला. जवळपास २८ वर्ष त्यांनी राज्यकारभाराचा गाडा सैन्याच्या सहकार्याने अतिशय कुशलपणे चालवला. कोणतेही कर्ज न काढता राज्याची तिजोरी भक्कम करून त्यांनी प्रजाहिताकडे लक्ष दिले. आदर्श राज्यकारभार कसा करावा याचा वस्तुपाठच अहिल्यादेवींनी घालून दिला. अहिल्यादेवी होळकर हे नाव इतिहासात अमर झाले. बाई काय राज्यकारभार करणार ही सनातनी अटकळ त्यांनी खोटी ठरवली. १३ ऑगस्ट १७९५ रोजी अहिल्यादेवींचे निधन झाले. प्रजाहितदक्ष, आदर्श राजकर्ती म्हणून इतिहासात अजरामर झालेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!



हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# कृषी विभागाने खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर हाती घेतील मोहीम



आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील व सावळदबारा परिसरात फर्दापूर, बनोटी, जरंडी व सोयगाव यंदा खरीप हंगाम तोंडावर आला असल्याने बाजारात बियाणे व खताची निकृष्ट दर्जा राहू नये शेतकऱ्यांना चांगल्या प्रतीचे बियाणे व रासायनिक खत मिळावी यासाठी तालुका कृषी अधिकारी आर.जी.गुंडिले यांनी पुढाकार घेऊन सोयगावात कृषी सेवा केंद्र दुकान तपासणीची मोहीम हाती घेतली आहे. यामध्ये कृषी सेवा केंद्र दुकानाची वेगवेगळ्या पद्धतीने तपासणी केली जाऊ लागली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना यावर्षी उच्च दर्जाचे बियाणे व रासायनिक खते मिळणार असल्याचा विश्वास यावेळी तालुका कृषी अधिकारी तालुका कृषी अधिकारी आर.जी.गुंडिले यांनी व्यक्त केला.

सोयगाव तालुक्यात सुमारे ८३ गावे असून ४२ हजार हेक्टर क्षेत्र खरीप लागवड योग्य आहे. खरिपात लागवड करण्यासाठी शेतकऱ्यांनी शेतीच्या अंतर्गत मशागत सुरू केली आहे. अंतर्गत मशागत दिल्यानंतर शेतकऱ्यांना पावसाची प्रतीक्षा असणार आहे. पाऊस पडताच शेतकरी खरीप हंगामात बियाण्याची लागवड करतो. परंतु बाजारात उपलब्ध असलेले बियाणे चांगल्या दर्जाचे असणे आवश्यक आहे. निकृष्ट दर्जाचे बियाणे शेतकऱ्यांनी लागवड केल्यास संपूर्ण वर्ष शेतकल्याचे वाया जाऊ शकते. त्यामुळे कृषी विभाग सतर्क झाला असून सोयगाव तालुक्यातही कृषी सेवा केंद्रांची तपासणी मोहीम हाती घेण्यात आली आहे.कृषी अधिकारी थेट कृषी सेवा केंद्राच्या दुकानात जाऊन विविध प्रकारची तपासणी केली जात आहे.यात सोयगाव कृषी विभागाने वेगवेगळे पथक तैनात केले आहे.सदरील पथके कृषी सेवा केंद्रावर जाऊन विषाणे व रासायनिक खताची मात्रा तपासून लागले आहे. खरीप हंगाम तोंडावर आला असल्याने शेतकऱ्यांची बियाणे खत खरेदीची लगबग सुरू झाली आहे. अशा भाई गर्दीत शेतकऱ्याला कमी प्रतीचे, निकृष्ट दर्जाचे खत दिल्या जाण्याची शक्यता नाकारता येत नाही यासाठी सोयगाव कृषी विभागाच्या भरारी पथकाने सोयगाव येथे कृषी सेवा केंद्राच्या कसून तपासणी कृषी अधिकारी आर.जी.गुंडीले यांनी केली आहे.मंगळवार सकाळपासून कृषी सेवा केंद्रांची तपासणी धडाक्यात सुरू होती.

# सविता शेळके यांना अहिल्यादेवी होळकर पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल अंबड तालुक्यातील डोमेगाव येथील सविता बाबासाहेब शेळके यांना राज्य शासनाच्या महिला व बाल विकास विभागाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्काराने बुधवारी सन्मानित करण्यात आले. सविता बाबासाहेब शेळके यांना ग्रामपंचायत स्तरावरील अहिल्यादेवी होळकर पुरस्काराचे वितरण डोमेगावचे सरपंच अशोक काळबांडे, उपसरपंच कल्पना रमेश सांगळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ग्रामसेवक सचिन एखुंडे, ग्रामपंचायत सदस्य चोथे, लक्ष्मण घुले, बापुसाहेब खांडेभराड, बाबासाहेब शेळके यांची प्रमुख उपस्थिती होती. अंगावरील दागिने गहाण ठेवून तसेच कर्ज काढून सविता बाबासाहेब शेळके यांनी डोमेगावात स्वखर्चाने २२२ शौचालय बांधून दिली आहेत. त्यांचे पती बाबासाहेब शेळके हे वृक्ष लागवडीतून पर्यावरणाचा संदेश देण्यासाठी झटत आहेत.






नक्षत्रवाडी येथील गट क्र. 8/1, समर्थ एलक्लेव्हमध्ये पहिल्या मजल्यावरील 2 बीएचके फ्लॅट अर्जंट विकणे आहे. एकूण क्षेत्रफळ 910 स्क्वेअर फूट, क्लिअर टायटल, सीएसएमएसएस कॉलेजपासून पाच ते सात मिनिटांच्या अंतरावर, रम्य वातावरणात, मेन रोडच्या अगदी जवळ,

संपर्क : मो. 7588818406

# चाळीस वर्षीय इसमाचा मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** येथील बाजारपेठेतील श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्या मागील उद्यानातील सार्वजनिक विहीर लगतच्या जागेत मंगळवार ( ता:३० ) सकाळी साडेआठच्या दरम्यान बेशुद्ध अवस्थेत सापडलेल्या इसमास प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी पोलिसांनी नेले असता संबंधितास मृत घोषित करण्यात आले. मृत झालेल्या व्यक्तीचे नाव मदन जाल म चव्हाण ( वय 40 वर्षे ) राहणार जैतखेडा तांडा तालुका कन्नड असे आहे. सदरहू व्यक्ती बाजार सावंगीतील दोस्त टेलर शिलाई दुकानात रोजंदारीवर दोन ते तीन वर्षापासून शिलाईचे काम करीत असे संबंधितास दारूचे व्यसन असल्याने दारू पिऊन कुठेही पडून असायचा दोन-तीन दिवसांपासून दुकानात कामावर देखील आला नव्हता सोमवारी सायंकाळी त्याने दारू सेवन केली असावी व रात्री उद्यानात पडलेला असल्याने त्यातच त्याला हृदयविकारचा तीव्र झटका आला असावा तो बेशुद्ध स्थितीत पडलेला मंगळवारी सकाळी साडेआठ वाजता दिलीप नलावडे यांच्या दृष्टीस पडल्यावर त्यांनी पोलीस पाटील कारभारी नरवडे यांना सांगितल्यावर त्यांनी पोलीस चौकीत खबर दिली. संबंधित व्यक्ती यास जमादार संजय सपकाळ योगेश ताठे सुहास डबीर संतोष पुंड यांनी प्राथमिक आरोग्य केंद्रात हलविले तेथील वैद्यकीय अधिकारी डॉक्टर अंजुमन निलोफर यांनी तपासून मृत घोषित केले.




महाराष्ट्र Business Katta













# पंढरीनाथ शेळके: संघर्षाच्या गडावर विजयी पताका लावणारा योद्धा

आधुनिक केसरी

**७ जुलै १९८७ ला आम्ही सुल्तानपूर सोडून हिवरा आश्रम ला रहायला आलो. ब्रम्हपुरी मूळ गाव जरी असले तरीही त्यावेळी हिवरा आश्रम ला यायचे काम पडत नसे. एकतर वाहनांचा अभाव आणि दुसरी गोष्ट म्हणजे ब्रम्हपुरी येथे सुख दुःखाच्या कामानिमित्त येणे असायचे.त्यामुळे हिवरा आश्रम ला आलो आणि पू शुकदास महाराज यांनी हिवरा आश्रम ची केलेली जडण घडण, टॉवर, त्यावरील श्रीकृष्णाची मूर्ती, कोराडी प्रकल्प, त्यावेळचे जुने शिवालय, त्याभोवती घनदाट वंडांचे जंगल,त्याच्या लोम्बणाऱ्या पारंब्या, गिन्यांनदेव ( ज्ञानदेव अर्थात ज्ञानेश्वर माऊली) यांच्या नावाने असलेल्या 4 समाध्या,बाजूला दुसऱ्या मंदिरात महादेवाची पिंड, एसी चा गारवा कमी वाटावा असा त्या मंदिरातील थंडावा हा सगळा परिसर मी उत्सुकतेने बघत होतो.**




सिद्धेश्वर राना पवार
संपर्क क्र.: 9422880080

ऊन,वारा न बघता फक्त भटकणे,परिसर नजरेखालून,पायाखालून घालणे आणि आश्रमात महाराजांनी बनविलेल्या पर्ण कुटीच्या बाजूला झाडांच्या खाली झोपणे असाच माझा दिनक्रम असायचा.अभ्यासात मन रमत नसायचं. त्यावेळी हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या हिंदुत्ववादी विचाराने झपाटलेली तरुणाई. मी सोमठाणा येथे आईच्या नातेवाईकांकडे गेलो.घरी मोठे भाऊ डॉ साहेबांचा लग्न सोहळा.त्यासाठी मूळ घेऊन चिखली नजीकच्या सोमठांणा येथे गेलो. मामानी आई बाबांना आहेर घेण्या ऐवजी मलाच कपडे घेतले आणि त्यावेळी मी संपूर्ण भगव्या रंगाचे शर्ट घेतले. हे सगळं सांगण्याच कारण म्हणजे त्यावेळी पंतप्रधान राजीव गांधी यांनी १८ वर्षाच्या तरुणांना मतदानाचा अधिकार दिला आणि झपाटलेल्या ह्या नवतरुणांनी बाळासाहेबांच्या हिंदुत्ववाच्या विचाराने झपाटला होता.त्यावेळी धर्मवीर स्व दिलीपराव रहाटे ,सोबतीला विद्यमान खासदार प्रतापराव जाधव यांनी मेहकर मतदारसंघ पिंजून काढला होता.त्यावेळी पंढरीनाथ शेळके हे नेहमी बाबांशी चर्चा करायला,त्यांचे मार्गदर्शन घ्यायला यायचे.१९८७-८८ च्या दरम्यान हिवरा आश्रम येथे शिवसेनेच्या शाखेची स्थापना करण्यात आली. शिवसेनेच्या हिवरा आश्रम शाखा प्रमुख म्हणून माझे मधवे भाऊ राजेशबापू पवार यांनी व्हावे अशी इच्छा धर्मवीर दिलीपराव रहाटे आणि श्री प्रतापराव जाधव यांनी व्यक्त केली होती. बाबांनी पंढरीनाथ शेळके यांचे नाव समोर केले.हा मुलगा होतकरू आहे,संघटनेला वेळ देऊ शकेल,निष्ठेने काम करेल,संघटनेचा आवाका वाढवेल व पदाला न्याय देईल असे सांगितले आणि अशा पद्धतीने पी वाय शेळके मामा हे हिवरा आश्रम च्या शाखेचे प्रमुख झाले आणि माझे भाऊ राजेशबापू पवार यांना सचिव करण्यात आले.( त्यावेळी सचिव पद दिल्या जायचे. मला आजही आठवते त्यावेळी नव्याने निवडल्या गेलेली कार्यकारिणी हिवरा बु रस्त्यावरील आश्रमाच्या शेतात टॉवर च्या रूम मध्ये पू शुकदास महाराज



वास्तव्य करायचे.त्यावेळी तिथे ही सगळी मंडळी महाराजांना भेटायला गेली,त्यावेळी महाराजानी ह्या सर्वांचा उत्साह चांगलाच वाढवला होता. शाखा प्रमुख झालेल्या पी वाय शेळके यांनी आपली निवड सार्थकी ठरवली.अधिकाऱ्यांकडे पाठपुरावा करून हिवरा बु ह्या गावात वीज आणली आणि त्याचा उद्घाटन सोहळा स्व दिलीपराव रहाटे,खा प्रतापराव जाधव, ऍड स्व एस टी म्हस्के,स्व रा.ना.पवार,तत्कालीन सरपंच स्व परमेश्वर वडतकर यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित केला होता. कुणाकडे ही लग्न सोहळे असोत, गळ्यात भगवा रुमाल घालून पंगतीत वाढणारे-त्या कार्यात झटणारे शिवसैनिक दिसायचे. सगळ्या गावाला एका ठिकाणी एकत्रित आणण्याचे काम पी वाय शेळके यांनी केले. त्यानंतर १९९० ला मेहकर विधानसभा मतदारसंघातून प्रतापराव जाधव यांना तर सिंदखेडराजा मतदारसंघातून वसंतराव मगर यांना शिवसेनेची उमेदवारी मिळाली. पी वाय शेळके मामा यांनी मगर यांच्या राजदूतवर दिवस रात्र न बघता खेडोपाडी जाऊन त्यांचा प्रचार केला. धडपड्या पी वाय शेळके यांची परिस्थिती अतिशय बेताची, त्यांचा उदरनिर्वाह चालावा, संसाराला हातभार लागावा म्हणून महाराष्ट्र अर्बन च्या मॅनेजर पदाची जबादारी पी वाय शेळके यांना प्रतापराव जाधवांनी दिली.कधी रिकरिंग,करणे,एम इ एस कॉलेज ला असतांना परिस्थिती मुळे ओसाड भागातील एम ई एस संस्थेच्या हॉस्टेल मध्ये राहणे, रात्री बेरात्री बाहेर गावावरून आले की घरी खालच्या गावात न जाता आमच्या घरी मुक्कामी थांबणे,आणि आपला संपूर्ण परिवार पोसणे ही सगळी कसरत पी वाय शेळके लीलया पार पाडायचे. पू शुकदास महाराज यांनी त्यांच्या अपंग व कर्णबधिर शाळेवर त्यांना नोकरीत सामावून घेतले आणि खऱ्या अर्थाने उकिरड्याचा पांग फिटने ज्याला म्हणतात अगदी तसाच पी वाय शेळके मामाच्या आयुष्याचा पांग फिटला आणि ते ताठ मानेने उभे राहले. पूर्वीच्या परिस्थिती ची जाणीव ठेवत ते आजची वाटचाल करत आहेत,म्हणूनच अनेक पुरस्काराचे ते मानकरी ठरले आहेत. आज ते सेवानिवृत्त होत आहेत. यानिमित्ताने त्यांना भावी वाटचालीचा शुभेच्छा



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

# कुस्तीपटुंनी आणखी किती अन्याय सहन करावा

आधुनिक केसरी

**आपल्याला न्याय मिळावा यासाठी गेल्या 34 दिवसांपासून जंतरमंतरवर कुस्तीपटुंचे आंदोलन सुरू आहे.परंतु सरकार कुस्तीपटुंना न्याय न देता बृजभूषण शरण सिंह यांना खतपाणी घालण्याचे काम करीत असल्याचे स्पष्ट दिसुन येते.बृजभूषण यांच्यावर लैंगिक शोषणाचे गंभीर आरोप आहेत.परंतु सध्याच्या परिस्थितीत "उल्टा चोर कोतवाल को डाटे"अशी भुमिका सरकार मार्फत व बृजभूषण शरण सिंह यांच्या मार्फत सुरू आहे.दिनाक 28 मे 2023 रोज रविवारला आपल्या मागण्यांसाठी नवीन संसद भवनाच्या दिशेने मोर्चा काढण्यात आला. परंतु सरकारने बृजभूषण शरण सिंह यांच्यावर कारवाई न करता अत्यंत निंदनीय पध्दतीने पोलिसांनी कुस्तीपटुंवर कारवाई केली व साक्षी मलिक,विनेश फोगट, संगीता फोगट आदींना पोलिसांनी ताब्यात घेतले.**








जंतरमंतरवर आंदोलन करणाऱ्या पदक विजेत्या कुस्तीपटुंना दिल्ली पोलिसांनी बळाच्या जोरावर रस्त्यांवरून उचलले व त्यांचे तंबू उखडून फेकले. कुस्तीपटूंना मारहाण करण्याचा विरोध करण्यासाठी आलेल्या त्यांच्या समर्थकांवरही पोलिसांनी काठ्या चालविल्या व त्यांना जंतरमंतरवरून हटवले.ही खेळाडूंच्या प्रती अत्यंत निंदनीय व भयावह कारवाई म्हणावी लागेल.रविवारी आंदोलक कुस्तीपटु व पोलिसांत झालेल्या संघर्षाप्रकरणी दिल्ली पोलिसांनी आंदोलकां विरूध्द प्राथमिक माहिती अहवाल ( एफ आय आर ) दाखल केला व भारतीय दंड विधानाच्या कलम 147,149,186,188,332,353, तसेच सार्वजनिक मालमत्ता नुकसान प्रतिबंधक कायद्याच्या कलम 3 नुसार हा एफ आय आर दाखल करण्यात आला आहे. सरकारने जर भारतीय कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष बृजभूषण शरण सिंह यांच्यावर योग्य वेळी उचित कार्यवाही केली असती तर हे प्रकरण चिघळले नसते.आता देशाला प्रश्न आहे की खेळाडूं पेक्षा बृजभूषण शरण सिंह महत्त्वाचा असल्याचे सरकारला वाटते.यावरून स्पष्ट होते की कुस्तीपटुंवर बृजभूषण शरण सिंह ने खरोखरच अत्याचार केलेला आहे व सरकार त्याला वाचवण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करीत आहे.परंतु ही बाब लोकशाहीच्या प्रती व खेळाडूंच्या प्रती अत्यंत निंदनीय व घृणास्पद आहे.देशातील कोणताही खेळाडू असो ती देशाची आन-बान-शान असते आणि आहे.कारण तो जगाचे भ्रमण करून देशासाठी नाव कमवीतो व पुरस्काराच्या माध्यमातून आणि पदकांच्या माध्यमातून देशाचा तिरंगा संपूर्ण जगात फडकवितो. यावरून देशाची किर्ती व खेळाडूंची कर्तबगारी जगाला दिसून येते.यामुळेच देशात खुशीचे आणि आनंदाचे वातावरण निर्माण होते व सर्वत्र उत्साह दिसतो. त्यामुळे त्यांचा प्रत्येक स्तरातून सन्मान व्हायलाच हवा.परंतु कुस्तीगीरांनी भारतीय कुस्ती संघाचे अध्यक्ष बृजभूषण शरण सिंह यांच्यावरील आरोपांची समाधानकारक चौकशी होत नसल्याने गेल्या 34 दिवसांपासून कुस्तीगीरांचे जंतरमंतरवर शांततेत आंदोलन सुरू असताना पोलिसांकडुन दमनशाही सुरू असल्याचे रविवारी दिसून आले ही बाब निंदनीय आहे व खेळाडूंच्या प्रती अशोभनीय आहे.यावर केंद्र सरकारने गांभीर्याने लक्ष देण्याची नितांत गरज आहे. भारतीय कुस्ती महासंघाचे अध्यक्ष ब्रृजभुषण शरण सिंह यांच्यावर एका अल्पवयीन कुस्तीपटूसह एकूण सात महिला कुस्तीगिरांचे लैंगिक शोषणाचे आरोप आहेत. त्यामुळे लैंगिक शोषणप्रकरणी अटकेची कारवाई करावी आणि चौकशीचा अहवाल सार्वजनिक करावा या मागणीसाठी दिनांक 23 एप्रिल 2023 रोज रविवार पासून आघाडीचे कुस्तीगिरांनी दिल्लीतील जंतरमंतरवर आंदोलन सुरू केले आहे.परंतु अचानक जंतरमंतरवर निदर्शने करणारे कुस्तीगीर आणि पोलिसांमध्ये दिनांक 3 मे 2023 रोज बुधवारला रात्री गोंधळ उडाला व आंदोलक कुस्तीगीर आणि पोलिसांमध्ये झटापट झाली.यामुळे आंदोलकांमध्ये आक्रमकतेचे वातावरण निर्माण झाले आहे.त्याचीच पुनरावृत्ती दिनांक 28 मे 2023 रविवारला दिसून आली.तरीही आंदोलक कुस्तीगीर न्याय मिळेपर्यंत आपल्या आंदोलनावर ठाम असल्याचे म्हटले आहे.3 मे 2023 च्या दिल्ली पोलिसांच्या कारवाईनंतर कुस्तीपटूंनी पदके, पुरस्कार सरकारला परत करण्याची तयारी दर्शवली होती .आंदोलकांचे म्हणने आहे की आम्हाला जर अशा प्रकारची वागणूक मिळत असेल तर या पदांचा आणि पुरस्कारांचा काय उपयोग ? त्यापेक्षा आम्ही पदके आणि पुरस्कार भारत सरकारला परत करून सामान्य जीवन जगतो.येवढे होवूनही सरकार बघ्याची भूमिका घेत आहे ही अत्यंत चिंताजनक बाब आहे.कारण ब्रृजभुषण शरण सिंह सत्ताधारी पक्षाचे खासदार असल्याने सरकार याप्रकणाकडे पाठ फिरवितांना स्पष्ट दिसून येते. ब्रृजभुषणवर लावलेले आरोप खरे की खोटे याची गांभीर्याने चौकशी व्हायलाच हवी. कारण कोणी जेव्हा आरोप करतो तेव्हा त्यात अर्धसत्य अवश्य असतें व कारवाई नंतर सत्य सामोरं येते. त्यामुळे ब्रिजभुषण शरण सिंह यांच्यावर असलेले आरोप अत्यंत गंभीर,घृणास्पद आणि निंदनीय आहे. त्यामुळे त्यांना भारतीय कुस्ती महासंघाच्या अध्यक्षपदावर रहाण्याचा तिळमात्र अधिकार नाही. याकरिता त्यांना संपूर्ण पदावरून सरकारने ताबडतोब बरखास्त करून फास्ट ट्रॅक कोर्टच्या माध्यमातून कारवाई व्हायलाच हवी व पीडितांना लवकरात लवकर न्याय मिळायला हवा.कारण कुस्तीपटुंचे आंदोलन चिघळविण्याचे काम स्वतः बृजभूषण सिंह करीत असल्याचे दिसून येते. ब्रृजभूषण शरण सिंह वरील आरोप राजकीय नसुन अती संवेदनशील आणि गंभीर आरोप असुन कुस्तीगीर पटुंच्या लैंगिक शोषणप्रकरणाचे आहेत. त्यामुळे भारतातील संपूर्ण खेळाडूंनी मग तो कोणत्याही क्षेत्रातील असो त्यांनी कुस्तीगीरांच्या आंदोलनाला सोशल मिडियाच्या माध्यमातून,ट्युटरच्या माध्यमातून, वर्तमानपत्राच्या माध्यमातून किंवा आंदोलन स्थळावर जाणवु अशा प्रकारे सर्वच स्तरातून खुले समर्थन करायला हवे. कारण ब्रृजभूषण शरण सिंह वरील आरोप अत्यंत गंभीर आणि चिंताजनक आहे व दिनांक 28 मे 2023 रोज रविवारच्या पोलिसांच्या कारवाईवरून असे लक्षात येते की सरकार पुर्णपणे बृजभूषण शरण सिंह यांच्या सपोर्टमध्ये असुन खेळाडूंच्या विरोधात आहे. त्यामुळे सरकार खेळाडूंना न्याय देण्याच्या तयारीत नसल्याचे वाटते. अशा परिस्थितीत देशातील संपूर्ण आजी-माजी खेळाडूंचे समर्थन कुस्तीगीरांना मिळणे अती आवश्यक आहे.कारण गेल्या चार महिन्यांपासून कुस्तीगीर पटु सरकारला न्याय मागत आहे.परंतु आंदोलक कुस्तीगीर पटु म्हणतात की जोपर्यंत बृजभूषण शरण सिंह यांना जेलमध्ये पाठवत नाही तोपर्यंत आंदोलन सुरूच राहील असे ठामपणे कुस्तीगीरांनी सांगितले. त्याचप्रमाणे संपूर्ण पदावरून बरखास्ती सुध्दा आवश्यक आहे.कारण सर्वसामान्य गुन्हेगारांवर ताबडतोब कारवाई होते तर बृजभूषणवर का नाही असा प्रश्न कुस्ती पटुं व सर्वसामान्यांच्या मनात भेडसावत आहे. सरकारने लक्षात ठेवले पाहिजे की देशाचा प्रत्येक खेळाडू देशाची पुंजी आहे. त्यामुळे ब्रृजभूषण सारखे अनेक अध्यक्ष येतील आणि जातील. परंतु खेळाडू तयार करायला अनेक वर्षे लागतात. कारण प्रत्येक खेळाडू हा आपल्या मेहनतीने व कर्तुत्वाने तयार होतो. कुस्तीगिर खेळाडूंचे आंदोलन पहाता आयपीएल क्रिकेटच्या संपूर्ण आजी-माजी खेळाडूंनी आंदोलक कुस्तीगीरांना खुले समर्थन द्यायला हवे. कारण प्रत्येक क्षेत्रातील खेळाडू हा देशासाठी खेळत असतो.त्यामुळे देशाचे सर्वच खेळाडू देशाची आन-बान-शान आहे.मी महामहीम राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, लोकसभा अध्यक्ष, प्रधानमंत्री या सन्मानीय मान्यवरांना विनंती करतो की कुस्तीपटुंच्या प्रकरणाकडे जातीने लक्ष केंद्रित करून खेळाडूंना योग्य न्याय द्यावा. खेळाडुंना न्याय मिळावा हीच अपेक्षा.जय हिंद!

# पूजनीय वटवृक्ष



पंकज वसंत पाटील
मो. 9850439579

आधुनिक केसरी

**आजच्या कॉम्प्युटर आणि मोबाईलच्या युगातही निसर्गाप्रती कृतज्ञभाव व्यक्त करणारी आपली भारतीय संस्कृती तिचे अमूल्य स्थान टिकवून आहे. देशभर विखुरलेल्या वड, पिंपळ, शमी, उंबर, तुळस यांना पवित्र मानून संरक्षण देणाऱ्या निसर्गरक्षणच्या परंपरा भारतीय संस्कृतीचे भुषण आहेत. या झाडांचे पूजन धार्मिक भावनेतून केल्या जात असले तरी त्यामागे आरोग्यदायी कारणे आहेतच. समग्र मानवजातीवर पशूपक्षी, वनस्पती कायमच उपकार करत असतात. त्यांनी शिकवलेला विभूतियोग आपल्या लक्षात राहावा म्हणून आपल्या ऋषी-मुनींनी त्यांची पूजा करण्याचा भाव ठेवला आहे.**

जेष्ठ पौर्णिमेला म्हणजेच वटपौर्णिमेला वटवृक्षाची पूजा अशाच भावनेतून केली जाते. अखंड सौभाग्याच्या आकांक्षाने सुवासिनी या दिवशी वडाची पूजा करतात. या पूजेसोबत सत्यवान सावित्रीची कथा निगडित आहे. पूर्वापार सांगत आलेल्या या धर्मिक कथांचा भावार्थ, त्यातील पात्रांच्या वर्तणुकीतून प्रतिकात्मक अर्थ लक्षात घेतल्यास बऱ्याच गोष्टी शिकायला मिळतात. वटपौर्णिमा व्रत ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशी पासून पूर्ण पौर्णिमेपर्यंत ही त्रिरात्र व्रत करावे असे सांगितले आहे. ज्यांना तीन दिवस उपवास करणे शक्य नसेल ते फक्त पौर्णिमेच्या दिवशी उपवास करून हे व्रत करतात. सावित्रीसह ब्रह्मदेव तसेच सत्यवान सावित्री, नारद व यमधर्म या देवतांचे पूजन या दिवशी केले जाते.

**सावित्री ब्रह्मसावित्री सर्वदा प्रियभाषिणी।**
**तेन सत्येन मां पाहि दुःखसंसारसागरात् ।।**
**अवियोगो यथा देव सावित्र्या सहितस्य ते ।**
**अवियोगास्तथाऽस्माकं भूयाज्जन्मनि जन्मनि ।।**

या मंत्राने सावित्रीची प्रार्थना करून सावित्रीची कथा श्रवण करतात.

पूर्वी भद्र देशात अश्वपती नावाचा एक परम धार्मिक व प्रजापालनतत्पर असा राजा होऊन गेला. त्याला सर्व सुखी होती; पण पोटी संतान नसल्याने तो फार दुःखी होता. त्याच्या उग्र तपश्चर्येस प्रसन्न होऊन ब्रह्मपत्नी सावित्रीने त्याला कन्याप्राप्तीचा वर दिला. सावित्रीच्या कृपाप्रसादाने कन्या झाली म्हणून तिचे नाव राजाने सावित्री असे ठेवले. सावित्री मोठी झाली पण तिच्या गुणसंपदेने व तेजस्वीपणामुळे दिपून जाऊन कोणी राजपुत्र तिला वरायला तयार होईना. तेव्हा राजाज्ञेने ती स्वतःच राजपुरोहित बरोबर वरसंशोधनार्थ बाहेर पडली. आपल्या पतीची निवड आपण करायची ही प्रथा अथवा ती स्वतंत्रता फार पूर्वीपासून आपल्या देशात मुलींना होती हे यावरून दिसून येते. तसेच राजाचा आपल्या कन्येवर असलेला विश्वासही यातून दिसून येतो. मुलीला दिलेल्या संस्कारांवर - शिक्षणावर त्याचा विश्वास असल्याने सावित्री योग्य पतीची निवड करेल असा विश्वास तिच्या वडिलांना होता. शाल्व देशाचा राजा द्युमत्सेनचा सद्‌गुणी पुत्र सत्यवान याला सावित्री पसंत करते. द्युमत्सेन अंध होता व शत्रूंनी राज्यभ्रष्ट केल्यामुळे तो आपली पत्नी व एकुलता एक मुलगा सत्यवान यांच्यासह अरण्यात राहत होता. राजकन्या असूनही राज्य वैभवाचा मोह सावित्रीला नव्हता.

सत्यवानाला मनाने वरून सावित्री घरी परतली त्यावेळी नारदमुनी तेथे आलेले होते. सावित्रीने सत्यवानाची निवड केली हे ऐकून नारदाला दुःख झाले. तो अश्वपतीला म्हणाले 'सत्यवान अल्पायुषी असून, आजपासून एका वर्षाने त्याचा मृत्यू होणार आहे, तेव्हा सावित्रीने दुसऱ्यावर निवडावा.' पण सावित्री आपल्या निवडीबाबत अढळ राहिली.



त्यानंतर अश्वपतीने सावित्रीचा सत्यवानाशी विवाह करुन दिला. सावित्रीने सासू-सासरे व पती यांची सेवा करण्यात आपला दिवस घालवू लागली. सत्यवानाचा मृत्यू चार दिवसांवर येऊन ठेपला, तेव्हा सावित्रीने त्रिरात्र सावित्री व्रत करण्याचा संकल्प केला. व्रताचे तीन दिवस संपले व चौथा दिवस उजाडला. हाच सत्यवानाचा मृत्यूदिन होता. त्या दिवशी सत्यवान दर्भ व काष्ट आणण्यासाठी वनात गेला तेव्हा सावित्री हट्ट करून त्याच्या बरोबर गेली. सरपणासाठी लाकडे तोडीत असता एकाएकी सत्यवानाचे डोके दुखू लागले, म्हणून तो सावित्रीच्या मांडीवर डोके ठेवून थोडावेळ निजला. एवढ्यात यमदूत त्याचे प्राण हरण करण्यासाठी तिथे आले, पण सावित्रीच्या तेजामुळे ते सत्यवानाचे प्राण हरण करू शकले नाहीत. तेव्हा यमधर्म स्वतः तिथे आले आणि सत्यवानाचे प्राण खेचून घेऊन जाऊ लागले, तेव्हा सत्यवानाच्या शवाला कोणी स्पर्श करू नये म्हणून जरूर ती तजवीज करून सावित्री यमधर्माच्या मागे निघाली. यमधर्माने तिला परत जायला सांगितले तरी ती परत फिरली नाही. सावित्रीने यमराजाला आपल्या भक्तीने संतुष्ट केले, यमराजांनी तिच्या पतिनिष्ठेवर प्रसन्न होऊन, पतीचे प्राण सोडून तीन इच्छा इच्छित वर मागण्याचे सांगितले तेव्हा हळूहळू यमाशी युक्तिवाद करून तिने सासऱ्याचे डोळे आणि गेलेले राज्य परत मिळवले; तसेच विनम्रपणे व बुद्धिचातुर्याने सत्यवानाचे प्राणही परत मिळविले.

भारत खंडात अनेक पतिव्रता प्रसिद्ध आहेत; पण त्यात सावित्री हीच आदर्श मानलेली आहे. सावित्री हे भारतीय संस्कृतीत अखंड सौभाग्याचे प्रतीक ठरले आहे.

**वटपौर्णिमा गं आली, ओटी आंब्याने भरू या ।**
**सण वर्षाचा आज, पूजा वडाची करू या ।।**

म्हणत आजच्या आधुनिक युगातही सुवासिनी मोठ्या आनंदाने व अध्यात्मिकतेने सौभाग्यलंकार परिधान करून पतीच्या दीर्घायुष्यासाठी वटपौर्णिमेचे व्रत करतात, ५ सुवासिनींची ओटी भरतात. सावित्रीचा पती सत्यवान वडाच्या झाडाखाली गतप्राण झाला आणि पुन्हा तिथे सजीव झाला या संकेताला अनुसरून स्त्रिया या दिवशी देवतुल्य मानल्या गेलेल्या वडाची पूजा करतात. वडाच्या मुळांशी पाणी घालतात आणि त्याला प्रदक्षिणा घालून सुताचे सात फेऱ्यांचे वेस्टन करतात त्याची नंतर त्याची पूजा करतात त्याच्या मुळाशी असलेल्या सावित्री, ब्रह्मदेव, सत्यवान सावित्री, धर्मराज व नारद यांच्या प्रतिमांचे पूजन व प्रार्थना करतात.

सावित्री सत्यवानाच्या कथेतील भावार्थ आपल्याला या व्रत परंपरेचे महत्व सांगून जातो. या कथेत आत्मविश्वासाअभावी सत्यवानाच्या पराक्रमावर धरलेली काजळी हळुवारपणे दूर करून सावित्री त्याला कर्तव्याची जाणीव करून देऊन योग्य मार्ग दाखवते, म्हणजेच भार्येने पतीला योग्य सल्ला व साथ दिल्यास पूर्ण घराचे कल्याण होते, हे यावरून समजते. सावित्रीने सत्यवानाच्या अंतःकरणात कर्तव्याची, कर्तुत्वाची, शौर्याची ज्योत पेटविली. हे सगळं पौर्णिमेच्या दिवशी वटवृक्षाच्या छायेत केलं म्हणूनही सौभाग्यासाठी सुवासिनी वडाची पूजा करतात. वटवृक्षाच्या पारंब्या जमिनीत शिरून पुन्हा त्यांना मुळा फुटून वर येतात व हा वृक्ष विस्तारित होतो म्हणून वटवृक्षाला अंत नाही. त्याचा वंशक्षय नाही तो अक्षयवट आहे. वंश सातत्याने टिकावा ही मंगल भावना वडाच्या पूजेच्या मागे असते. समाजरूपी वटवृक्षाखाली सत्यवान पुरुषतत्वाचे आणि सावित्री ही स्त्रीतत्वाचे प्रतिक आहे. तर यमधर्म हा कधीही कुणासाठी न थांबणाऱ्या काळाचे प्रतिक आहे. सत्यवान व सावित्री आणि यमराज एका प्रसंगाने एकत्र आले व भारतीय संस्कृतीचे प्रतीक म्हणून वटवृक्षाच्या रूपात लोकांच्या नजरेत आले. कथेतील मृतवत सत्यवान म्हणजेच कर्तव्यच्युत व्यक्तीचे प्रतीक आहे. सावित्री कर्तव्य जागृतीचे प्रतीक आहे व यम काळाचे प्रतिक आहे. काळाची पावलं सावित्रीने ओळखली. संकटाला न घाबरता न डगमगता काळाबरोबर चालणारी सावित्री निश्चयापासून तसूभरही हलली नाही. आपल्या जीवनात येणाऱ्या संकटाला न डगमगता कर्तव्यजागृतीचा वसा पूजन करून, स्त्री वर्गाला कर्तव्याची जाग आणणं हे या प्रतीकातून समजते.

वटवृक्षाची पुनश्च निर्मीती व विस्तार करणाऱ्या पारंब्यांप्रमाणे मानवता व संस्कार एकपिढीपासून दुसऱ्या पिढीपर्यंत प्रसारित करण्यासाठीही भारतीय संस्कृतीत वृक्षसंवर्धन, वृक्षपूजनाचे महत्त्व दिलेले आहे. वटपौर्णिमेला सुवासिनी स्त्रिया वडाला सात फेरे धाग्यानी बांधतात. आरोग्यासाठी, प्रेमासाठी, यशासाठी दीर्घायुष्यासाठी, अतूट-सुंदर नात्यासाठी, तसेच पर्यावरण साधण्यासाठी असलेले हे सात फेरे आहेत. वडाची साल, बिया, पाने, मूळ, खोड सगळच औषधी गुणधर्म युक्त आहे. नेत्रविकार, अतिसार, संधिवात अनेक रोगांवर उपयोगी असणारा हा वडाचा वृक्ष आहे. रोगराई दूर व्हावी हासुद्धा उपकारी वडाच्या पूजनाच्या मागचा उद्देश आहे. त्याच्या गुणकारी पारंब्या उकळून ते तेल केसांना लावल्यास केस लांबसडक होतात. वटवृक्षाचं जीवन ऋषितुल्य आहे. स्वतःला उन्हात तापवून घेऊन वाटेच्या पांथस्थाला शितल छाया देणं, कोणाकडून कसली अपेक्षा न ठेवता इतरांना आधार-छाया देणारा वटवृक्ष परोपकारी आहे. चोवीस तास प्राणवायू देणाऱ्या वडाच्या सानिध्यात जाऊन त्याचा जीवन संदेश आत्मसात करून आचरणात आणावा, हा या व्रतामागील संदेश आहेत. 'स्वतःसाठी जगलास तर मेलास, दुसऱ्यासाठी मेला तर उत्तम जीवन जगलास' ही शिकवण देणारा वटवृक्ष पूजनीय आहे यात शंकाच नाही.

# शिक्षणाच्या आईचा घो : २



सचिन कोरडे
उस्मानाबाद

आधुनिक केसरी

**मुलांनो बारावीची भरघोस गुणवत्ता म्हणजेच तुमचं पुढील भविष्य नाही, गुणवत्ते ऐवजी स्वतःमधील सिद्धता ओळखा. पालकांनो आपलं मूल म्हणजे मशिनरी नाहीये, त्याला लातूरला दोन वर्षे क्लासेसच्या माध्यमातून सर्विसिंग केली म्हणजे डॉक्टर इंजिनिअर होईल. धाराशिव (सचिन कोरडे)पूर्वी शिकवणी शाळेत अभ्यासामध्ये गणितात किंवा इंग्रजी विषयात कच्चे असणारे किंवा ज्यांना एकदा शिकवलेले समजत नाही.**

अशा मुलांसाठी त्या-त्या विषयाची,अभ्यासाची उजळणी होण्यासाठी पालकांकडून मुलांना शिकवणी साठी पाठवले जायचे. आपला मुलगा शाळेत 'ढ' न राहता किमान परीक्षेत पास होण्यापुरती शिकवणी लावायची पद्धत होती. कारण काही वर्षांपूर्वी मुलांना शाळेत नापास करण्याची पद्धत होती.! आता बदलत्या शिक्षण व्यवस्थेमुळे मुलांना नापास करणे ही बंद झाल आहे. एकीकडे बारावी नंतर नीट, सीईटी,जेईई तयारीसाठी पालकांकडूनच ग्रामीण व शहरी कॉलेज कमालीची साशंकता आहे. म्हणूनच पुढे इंजिनीअरिंग कॉलेजसाठी किंवा वैद्यकीय क्षेत्रात करिअरसाठी आठवीपासूनच मुलांना शहराच्या ठिकाणी शिकवण्यासाठी पाठविले आहे. ज्यांची आर्थिक परिस्थिती चांगली आणि एखादा दुसरा मुलगा अशी कुटुंबे तर लाखोच्या-लाखो रुपये वर्षाला खर्च करून मुलांना त्या जीवघेण्या स्पर्धेत ढकलू लागली. भरगच्च पगारदार, व्यावसायिक राजकारणी, सदन कुटुंब यामुळेच आपोआपच शिक्षण महाग झालं. याचा फटका मात्र मध्यमवर्गीय कुटुंबाला चांगलाच बसला आहे. कारण ग्रामीण भागातील जेमतेम परिस्थिती असणाऱ्या कुटुंबाला ह्या महागड्या शिक्षणाचा कर्जाचा डोंगर डोईजड होत



आहे. कारण सामान्य कुटुंबातील ज्यांची मुलं शाळेत शिक्षणात अव्वल असतात. मुलांचे शिक्षण खूपच जिकरीचे झाले आहे. कारण शेजारच्या नोकरदार कुटुंबाने आपला पाल्य शिक्षणात अव्वल नसताना शिक्षणासाठी व क्लासेसला शहरात ठेवला आहे. मग आपल तर मुल वर्गात अव्वल येतं,म्हणून मग आपल्या मुलाच्या शिक्षणासाठी आपण कमी पडायचे नाही. असंच काहीसं ठरवून सामान्य वर्गातील कुटुंब महागड्या झालेल्या शिक्षण प्रणालीमध्ये गुरफटून जाऊ लागली आहेत. आता कॉलेजला करायची गरज नाही,फक्त प्रवेशासाठी कॉलेजचा वापर करा, असे सांगत क्लासेस वाल्यांकडून कोचिंग क्लासच्या स्वतःच्या नोट्स, सराव परीक्षा, त्यांचे वेगळे पैसे, उन्हाळी वर्ग, शॉर्ट टर्म कोर्सेस, विविध सुविधांनी सजवलेले महागडे होस्टेल,जेवणासाठी मेस, सुसज्ज असं वाचनालय अकरावीनंतर बारावीचे फक्त व्हेकेशन, सीईटी प्रवेश परीक्षा क्लास यातून विद्यार्थी बाहेर जाऊ न देता."विद्यार्थी म्हणजे एखादी मशनरी समजुन,"त्याला सकाळी सहा ते रात्री दहा सारे वर्ग चालू ठेवले जातात . स्वतःच्या अद्ययावत अभ्यासिका त्यांनी निर्माण केल्या. अशा शैक्षणिक सुविधा व शिक्षण करोडोंचे अनुदान घेणाऱ्या कॉलेजांना का जमू नये ? असाच काहीसा प्रश्न आर्थिक परिस्थिती जेमतेम असणाऱ्या व क्लासेसमध्ये मुलाला ठेवू न शकणाऱ्या पालकांना सतत भेडसावत आहे.

## मोगऱ्याचे फुल

**शुभ्र मोगऱ्याचे फुल**
**सावळ्या घनात भिजले,**
**गुंडाळून पाकळ्यांना**
**कुशीत पानांच्या निजले.**


**धुके सावळे सरले**
**चांदव्याला आली जाग,**
**फाल्गुनाच्या पावसाने**
**धुतला धुळींचाही डाग.**

**एक एक थेंब ओला**
**पुन्हा मातीत रुजला,**
**गंध लेवूनिया मृदेचा**
**आज समीरही सजला.**


**विझले उन्हाचे निखारे**
**झाली शितलशी रात,**
**काळया निशेच्या बटांना**
**कुरवाळती चंद्राचे हात.**

**रंग लावण्या प्रेमाचा**
**घन दूरूनिया आला,**
**कुशीत शिरून धरेच्या**
**अंतरंगी तृप्त झाला.**

**प्रा.भावना गांधिले, अ.नगर**



# केवढे हे क्रौर्य!!



डॉ. विजय पांढरीपांडे
मो. 7659084555

आधुनिक केसरी

**नुकतीच देशाच्या राजधानीत दिल्ली येथे घडलेली घटना ही क्रौर्याची परिसीमा म्हटली पाहिजे.भर दिवसा एका तरुणाने अल्पवयीन तरुणी ला एकदोनदा नव्हे ३४वेळा सुऱ्याने भोकसले. त्याने समाधान झाले नाही म्हणून की काय मोठ्या दगडाने ठेचले. हे भर दिवस घडले. आजूबाजूला दहा बारा जण तिथून जा ये करतात. सारे थंड डोळ्याने बघतात. पण त्या तरुणाचा हात धरण्याची कुणाची हिंमत होत नाही. कुणी त्याला रोखण्यासाठी पुढे येत नाही. पोलीसही दिसत नाहीत.**

हे सी.सी.टी.वी.त बद्ध झालेले चित्रण बघून आपल्या जीवाचा थरकाप होतो. प्रेम भंगातून हे सारे घडल्याचे सांगण्यात येते! हे कसले प्रेम ? जे नकाराने द्वेशात परिवर्तित होते, संतापाने क्रूर होते. जीव घेण्यापर्यंत मजल गाठते,त्याला प्रेम कसे म्हणायचे ?नकार पचविण्याची हिंमत नसणे, सुडाने पेटून उठणारी भावना म्हणजे प्रेम कसे असू शकते ?मनावर ताबा नसणे, अपयश पचविण्याची ताकद गमावून बसणे हे तरुणाई चे कोणते लक्षण आहे ? आश्चर्य वाटते ते आपल्या थंड,बधीर समाज मनाचे.अवती भवती चांगली गर्दी. त्यात बायका पुरुष सारेच दिसतात. पण कुणीही हे भीषण क्रूर कृत्य थांबवायला पुढे येत नाही.याला गर्दीचे मानस शास्त्र म्हणून तज्ञ एखादी गोंडस संज्ञा देतील.पण रस्त्याने चालणारे, ही घटना बघून चक्क काढता पाय घेणारे,२०-२१ वर्षाच्या किरकोळ तरुणाला रोकू न शकणारेलोक नेमकेकोणत्या सदरात मोडतात ? या प्रश्नाचे उत्तर विचार करूनही मिळत नाही. काही महिन्यांपूर्वी दिल्लीतच घडलेल्या घटनेची ही पुनरावृत्ती आहे. अशा अनेक घटना त्यानंतर घडल्या आहेत, घडताहेत. याचा अर्थ कायद्याचा धाक राहिलेला नाही. भीती तर नाहीच. अशा केसेस वर्षानुवर्षे कोर्टात चालतात. अनेक बाबतीत तर संशयाचा फायदा मिळून, पुरेसा पुरावा नाही म्हणून गुन्हेगार काही वर्षांनी जेल मधून चक्क निर्दोष सुटले आहेत. म्हणूनच पुन्हा पुन्हा असे गुन्हे घडताना आपण पाहतो. खरे तर टी.वी.वरील दृश्ये इतकी स्पष्ट धडधडीत पुरावा असताना सुप्रीम कोर्टाने या बातमीची दखल घेऊन ताबडतोब फाशीचा निकाल द्यायला काय हरकत आहे ? पण तसे घडत नाही,घडणार नाही. पोलीस केस व्हावी लागते, साक्षी पुरावे लागतात.तारीख पे तारीख द्यावी लागते. वकिलाच्या सोयीसाठी केस लांबवावी लागते. मग निर्णय येतो. तो न्याय असतो की नाही हे जो जीव गेला त्याच्या दृष्टीने प्रश्न चिन्हच! मागे अशाच स्वरूपाच्या गँग रेप करणाऱ्या गुन्हेगारांना पोलिसांनी चक्क एन काऊंटर करून निकाल लावला होता. हे कायद्याच्या दृष्टीने अयोग्य वाटले ट्री तडका फडकी न्याय या तत्वाला धरून योग्यच वाटते. काही देशात अशा निर्दयी



गुन्हेगारांना भर चौकात फाशी दिले जाते, किंवा फटके मारून हाल करून मारले जाते!हे आपल्याकडे न्याय्य ठरणार नाही. पण आरोपीचे कृत्य कठोर, निर्दयी नव्हते का ? ते घृणास्पद क्रौर्य नव्हते का,याचाही विचार झाला पाहिजे. हे सारे मनो विकारामुळे घडते. मानसिक संतुलन ढासळल्याने घडते. आपल्याकडे अशा मनो विकारांकडे गांभीर्याने बघण्याची व्यवस्थाच नाही. आपले शालेय शिक्षण अभ्यास, परीक्षा, करीयर या भवतीच घोटाळते. शरीराकडे लक्ष दिले जाते. मना कडे पूर्ण दुर्लक्ष होते. त्यामुळे लहान मुलांत द्वेष भावना दिसतात. ती एकमेकाशी कचा कचा भांडतात. एकमेकांना घाणेरड्या शिव्या देतात. परदेशात तर बंदुकी चालवतात. प्राण घेतात! तंत्रज्ञानाने एकीकडे प्रगत झालेला ,चंद्रावर पोहोचलेला समाज आपल्याच सहृदाशी इतक्या क्रूरपणे कसा वागू शकतो ?माणसे माणसाशी माणसा सारखी न वागता, जनावरासारखी वागतात. क्वचित जनावरापेक्षाही बदतर, खालच्या स्तरावर जाऊन वागतात. प्राण्यातली निष्ठा, तेव्हढे देखीलप्रेम आपल्यात राहिलेले नाही. आपली संस्कृती, आपल्या पोथ्या, पुराणे,त्यातील शिकवण, आपले अध्यात्म, आपले ऋषी मुनी, गुरू, त्यांची शिकवण.. हे सारे कुठे गेले ? आपण याचाच अभिमान बाळगतो ना ? याच वैचारिक, बौधिकसंपत्ती च्या भरवशावर विश्व गुरूहोण्याच्या बातामारतो ना ? मग हेचक्रौर्य, हाच द्वेष, हाच संताप, हीच पाशवी शिकवण आपणजगात पसरवीणारआहोत का ? आज सोशल मीडिया मुळे काही लपून राहत नाही. क्षणात सारे व्हायरल होते. आपण पाश्चात्य संस्कृतीला नवे ठेवतो. मग ही क्रूर दृश्ये पाहून त्यांनी काय करायचे ? या समस्या झटकून टाकण्या सारख्या नाहीत. या मानसिक विकृती कडे आपण गांभीर्याने पाहिले पाहिजे. ही सरकारी समस्या म्हणून हात झटकून चालणार नाही. ही आता घर घरकी कहानी झाली आहे. हे दुष्ट प्रवृत्तीचे संकट प्रत्येक घरा दारात उभे आहे. त्याचे रंग रुप थोडे वेगळे असू शकते. पण शेवटी गांभीर्य तितकेच आहे. लहान मुलांसमोर भांडणारे सुशिक्षित नवरा बायको, इस्टेटी साठी रक्ताच्या नात्यात होणाऱ्या हाणामाऱ्या, राजकीय सुडापोटी होणार खूनखराबा, जीवा भावाच्यामैत्रीतहोणाऱ्या लढाया.. अनेक उदाहरणे आहेत. जी आपल्याला प्रगत शिखराकडेनव्हे तर नाशा च्याखोल गर्तेत ढकलणाऱ्या संहारक स्वरूपाच्या आहेत.हे ज्ञानयुगकसेम्हणायचे ? याला आध्यात्मिक विकास,सांस्कृतिक वारसा कसे, का म्हणायचे ? गंभीर विचार करायला प्रवृत्त करणाराप्रश्न आहे! माणसा जागा हो,काळरात्र आहे असा सावध इशारा देण्याची वेळ आली आहे. पण लक्षात कोण घेतो, ऐकतो कोण ?हाच प्रश्न आहे!

# रेल्वेने मनमानीने कुठलीही नावे देवून खोटी प्रतिष्ठा मिळवू नये

आधुनिक केसरी

सद्या रेल्वे प्रशासन रेल्वेस्थांनकांच्या नांवात गडबड करत असल्याचे समोर आले आहे हार्बर मार्गावरील "कोळी वाडा"हे मुंबईच्या आदिम समाजाचे नांव असलेल्या रेल्वेस्थांनकाचे आधीचे नांव पुसून पंजाबी लोकांना मान देत "गुरु तेग बहादुर" नगर करुन टाकले आहे. अशाच प्रकारे नेरुळ - उरण रेल्वेस्थानकांच्या नावाबाबत सुद्धा असेच घडले आहे. वास्तविक पाहता कुठलेही रेल्वे स्थानक असो अथवा नगर, विमानतळ, बसस्थानक यांना नावे देताना त्याला ऐतिहासिक वारसा लाभलेला असतो किंवा त्या भागाची ओळख असलेली नावे दिली जातात. सर्वसामान्य जनता असला प्रकार करु शकत नाही. मात्र आपली मतपेटी सांभाळून राजकीय लाभ उठविण्यासाठी प्रत्येक विभागाच्या अधिकाऱ्यांना हाताशी धरुन राजकिय पुढारी आपल्याला हवे तसे सर्वकाही सोपस्कर पूर्ण करुन घेत आहेत. त्याचीच ही प्रचिती असावी, असे वाटते तसेच अशा घटनांची जनतेला थोडीही कल्पना नसते रेल्वे प्रशासनाने आपल्या मनमानीने कुठलेही नांवे देवून खोटी प्रतिष्ठा मिळवू नये तसेच समाजामध्ये, जनतेमध्ये विघातक, वादंग निर्माण होतील असे रेल्वे प्रशासनातील अधिकाऱ्यांनी धारिष्ट्य दाखवू नये लोकभावनेचा आदर करुन स्थानिक मूळ महसुली गांवाप्रमाणे असलेलीचे नावे स्थानकांना देणे कधीही हिताचे ठरणारं आहे !

राजू जाधव, मांगूर जि. बेळगाव



# असहमतीचे रंग : अशोक पळवेकर



किरण डोंगरदिवे
संपर्क क्र. 7588565576

आधुनिक केसरी

**अशोक नामदेव पळवेकर हे समकालीन वास्तवाचे वेगवेगळे प्रस्तर उलगडणारे आंबेडकरवादी जाणिवेचे कवी म्हणून मराठी साहित्यविश्वात ओळखले जातात. तसेच ते एक चिंतनशील समीक्षक म्हणूनही ख्यातकीर्त आहेत. १९८० सालापासून ते वेगवेगळ्या नियतकालिकांतून व साहित्यपत्रिकांतून सातत्याने काव्यलेखन करत आहेत. या दीर्घ कालावधीतील त्यांच्या काही निवडक कवितांचा (एकूण कविता १००) असहमतीचे रंग; हा त्यांचा काव्यसंग्रह अलीकडेच प्रकाशित झाला आहे. या काव्यसंग्रहातून सभोवतालच्या समकालीन वास्तवाचा एक व्यापक पट उलगडत गेलेला आहे. तसेच पळवेकरांच्या या कवितेतून सभोवतालच्या एकंदरीत मानवी जगण्याचे आणि समकालीन व्यवस्थेच्या वास्तवरुपाचे विवेकनिष्ठ चित्रण अगदी सहजीभावाने व चिंतनशील वृतीने आविष्कृत झालेले आहे.**

**(मागील अंकावरून)**

अशोक नामदेव पळवेकर हे इतिहासातील वास्तव सांगत त्या इतिहासातील सत्य अधोरेखित करतात, तसेच इतिहास आणि वर्तमान यांची सांगड़ घालून नेमके कोठे काय होते आणि कोठे काय असावे, याचेही भान आपल्याला आणून देतात. म्हणूनच असहमतीचे रंग या कवितासंग्रहातील प्रत्येक कविता वाचकांना विचार करायला बाध्य करणारी असून कवी अशोक नामदेव पळवेकरांच्या गंभीर आणि
चिंतनशील व्यक्तिमत्त्वाचे पडसाद त्या कवितांत अधोरेखित झालेले आहेत. स्वतः कवी ज्या विशिष्ट भूमिकेत जगत आले आहेत त्याचे प्रतिबिंब त्यांच्या शब्दातून समोर आल्यामुळे त्यांची कविता अधिक सजीव वाटते. कवी पळवेकर यांच्या कवितेचा एकंदर सूर हा सामान्यतः वर्तमानावर आणि त्या वर्तमानातील विसंगतीवर बोट ठेवणारा आहे. आजच्या काळात सत्ताधिकारी यांच्या विरोधात बोलणे म्हणजे स्वतःला देशद्रोही हे बिरुद लावून घेणे होय. त्यामुळे साहित्यिक सुद्धा भूमिका घेऊन बोलणे टाळत आहेत, असे आपल्या लक्षात येते. मात्र कवी पळवेकर निर्भीडपणे आपले मत मांडत जातात. विरोधासाठी विरोध न करता अपरिहार्य कारणांसाठी विरोध हा त्यांच्या भूमिकेचा सकारात्मक पैलू आहे. जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर देशाला महासत्तेची गोंडस स्वप्ने दाखवणाऱ्या सत्तेला फटकारताना अजूनही
देशात दलित, आदिवासी, भटके आणि इतर समूह है निम्न पातळीवरचे जीवन कसे जगत आहेत, त्यांच्या
वाट्याला हे शतक अजून आलेलेच नाही, या गोष्टीचा विचार होण्याची नितांत गरज कवीने प्रतिपादन केली आहे. तरीही, या गोष्टीकडे कानाडोळा करणारी आणि भांडवलदारी वर्गाला पोषक असलेली आजची सत्ता आणि सताधिकारी यांची धोरणे नेमकी कशी आहेत, हे सांगत असताना ते एका कवितेत म्हणतात तरीही, सत्ता भरल्यापोटी तिची आयाळ कुरवाळत सिंहासनावर बेफिकीर ढेकर देत आहे. हे वास्तव भयंकर आहे. मॉब लीन्चिंग आणि एन्कौन्टर या कविता सुद्धा राजसत्ता आणि भांडवली सत्ता यांच्या
संगनमताने आखल्या जाणाऱ्या अर्थकारणाचे आणि अल्पसंख्य व आदिवासी समूहाला विरोधाचे लक्ष्य करणारे धोरण उजेडात आणणाऱ्या आहेत. या कवितासंग्रहात कवीने जगभरातल्या युद्धखोर प्रवृतींचा निषेधच केला आहे. हा निषेध करणारी कवीची भूमिका बुद्धाच्या व्यापक मानवतावादाला आणि कारुण्याभावाला प्रमाण मानणारी आहे. म्हणूनच युद्धोन्माद या कवितेत निरपराध जनतेवर युद्ध लादणाऱ्या प्रवृतीवर आसूड ओढताना ते
म्हणतात काही आपमतलबी सतेचे हलवाई
लादत असतात युद्ध त्यांच्यावर त्यांच्यासाठी युद्ध असतो एक खेळ, पोरखेळ जिंकण्या-हरण्याचा किंवा व्यापार शस्त्र-विक्रीतल्या नफेखोरीचा किंवा, उन्माद रक्ताच्या खुमखुमीचा जो सैन्याच्या जीवावर असतो पोसलेला, उदार देतो झोकून सर्वांनाच मरणाच्या अपंगतेच्या, रोगराईच्या, भुकमारीच्या खाई
हे नसते त्यांच्या ध्यानीमनी, की युद्धात नसते कुणीच जिंकत वा हारत केवळ पराभूत होत असते एकटी मानवता युद्धात कारण युद्धविराम या कवितेत म्हटल्याप्रमाणे सीमेच्या अलीकडे / उभे आहेत हे सैनिक आणि सीमेच्या पलीकडे / उभे आहेत ते सैनिक दोघेही माणसेच आहेत! ही भावना, हा विचार फार महत्त्वाचा आहे. म्हणूनच राजकीय नेतृत्वाची सत्तेसाठी एकमेकांवर चाललेली करघोडी
करण्याची वृत्ती, सत्तास्थानावरील जबाबदार व्यक्तींची सर्रास आणि सराईतपणे खोटे व बेताल तसेच चिथावणीखोर वक्तव्ये करण्याची भूमिका ह्या सर्व बाबींचा कवीने आपल्या काव्यसंग्रहात योग्य व सडेतोड समाचार घेतलेला आहे. तसेच लोकांमध्ये धार्मिक उन्मादाला खतपाणी घालणाऱ्या सत्तेच्या विरोधात सर्वसामान्य जनतेच्या प्रचंड राग व असंतोष आहे हे सांगताना कवीने एक बातचित नसिरुद्दीन शहाशी ह्या कवितेत साहब, लोगोमे गुस्सा बहुत है! असे नसिरुद्दीन शहाच्या चित्रपटातील एक वाक्य नेमकेपणाने वापरले आहे. आणि देशातील धार्मिक उन्मादाच्या पार्श्वभूमीवर करवान-ए-मोहब्बतमध्ये नसिरुद्दीनने डरा नहीं, गुस्सा हु हे विधान केल्यानंतर त्याविरोधात देशभरातून उमटलेल्या कडवट प्रतिक्रियांच्या संदर्भात कवी अशोक नामदेव पळवेकर यांनी उपरोध आणि उपहासाच्या अंगाने हे विधान नसिरुद्दीन शहाने करायला नको होते, तर ते विधान हरियाणाचा पहलू खान, मुस्तैन अब्बास, राजस्थानचा अफराजूल, दिल्ली मथुरा ट्रेनमधील प्रवासी जुनैद, शहजाद अहमद, सिबतुल्लाह, झारखंडचा इम्तियाज मजलूम, महाराष्ट्रातील प्रियंका, इतर राज्यांतील आसिफा, संजली, बिहारमध्ये दिवसाढवळ्या नग्न केल्या गेलेली स्त्री, गुजरातमधील इशरत जहा सोहराबुद्दीन, कौसर, प्रजापती, हरेन पंड्या,
उनातला दलित तरुण, जज्ज लोया, नजीब, रोहित वेमुला, अंकित सक्सेना आणि सुबोध सिंह या लोकांनी ते बोलायला पाहिजे होते असे म्हटले आहे. कारण हे सर्व लोक धर्मद्वेष आणि धार्मिक कट्टरतावादाचे शिकार आहेत! म्हणूनच तो राग, तो संताप आपल्या काव्यातून व्यक्त करताना आपल्या शब्दांना धार लावून सभोवतालात जे जे विसंगत आहे त्यावर हल्ला करणाऱ्या मोजक्या लढवय्या कवींमध्ये या कवीची नोंद करावी लागते. असहमतीचे रंग या कवितासंग्रहातील कवी अशोक नामदेव पळवेकर यांच्या कवितेचे एक वैशिष्ट्य म्हणजे ही कविता अतिशय साधी, सोपी आणि सरळ तितकीच अभिजात आहे. या कवितेची भाषाशैली स्वतंत्र आहे. अनेकदा अनेक कवींच्या कविता वाचल्यानंतर वाचकाच्या हाती काहीच लागत नाही. किंवा, लागले तरी त्याचे प्रमाण अल्प असते. परंतु या कवितेच्या बाबतीत मात्र असे घडत नाही. कारण आपल्याला आपल्या वाचकाला नेमकेपणाने काय सांगायचे आहे, शिवाय आपण ते कोणाला सांगणार आहोत याचीही जाणीव कवीला आहे.




म्हणूनच आपण जे सांगणार आहोत ते समोरच्या वर्गाला सहज समजले पाहिजे अशी त्यांची धारणा असल्याने त्यांची प्रत्येक कविता वाचकाला अगदी सहजपणे भावते आणि समजतेही ! या काव्यसंग्रहात आपल्या समकाळाचा एक व्यापक आणि विस्तृत पट आलेला आहे. त्यातून आपल्याला आपल्या समकाळाचे स्वभावदर्शन तर घडतेच, सोबतच कवीची आंबेडकरवादी विचारसरणी आणि मानवतावादी
जीवनदृष्टी यांचाही सतत प्रत्यय येत राहतो. थोडक्यात, या कवितेत : भारतीय समाजव्यावास्थेतोल सामान्य माणसाच्या जगण्यातील ताण-तणाव आहेत. समाजातील धार्मिक-जातीय असहिष्णुता आहे, क्रौर्य आहे, दहशत आहे. पुरुषसत्ताक व्यवस्थेतील हिंस्रता आहे. सत्ताधीशांच्या वर्तनातील सामाजिक-राजकीय पाखंड आहे. मूलतत्त्ववादी विचारसरणीतून फोफावत जाणारा धार्मिक व सांस्कृतिक उन्माद, कट्टरतावाद आहे. तसेच भांडवली आक्रमकता आणि सताशरण मीडिया, प्रशासन व न्याययंत्रणा यांची भ्रष्ट वास्तवरुपेही आहेत. अलीकडच्या काळात जीन ड्रेझ यांनीद रिव्होल्ट ऑफ दी अप्पर कास्टस या ग्रंथात संघाच्या व केंद्र सरकारच्या भूमिकेबद्दल म्हटल्याप्रमाणे- लोकशाहीविरुद्धचे उच्च जातींचे अत्यंत शांततापूर्ण असणारे बंड लोकशाही संस्थांवर आता अधिक प्रखर हल्ल्याचे स्वरूप धारण करीत आहे. त्याची सुरुवात विरोधी मत व्यक्त करणाऱ्या व्यक्ती व अभिव्यक्ती स्वातंत्र्यावरील हल्ल्याने झालेली आहे. परिणामी, आपल्या विरोधी मताची स्पेस संपुष्टात आली आहे. हेच वास्तव वेगवेगळ्या घटना-प्रसंगांतून वेगवेगळ्या अंगाने या कवितासंग्रहात अधोरेखित झालेले आहे. म्हणूनच प्रख्यात कवी, समीक्षक व विचारवंत डॉ. यशवंत मनोहर यांनी या कवितेची भलावण
करताना त्यांच्या प्रस्तावनेत समकाळाचे वर्गचरित्र आणि असहमतींचा आकृतिबंध मांडणारी कविता असा या कवितेचा सार्थ गौरव केला आहे. कवितासंग्रहाच्या मुखपृष्ठावर प्रसिद्ध छायाचित्रकार संजय दळवी यांनी टिपलेले एकाच भूमीतून आपला जीवनरस घेणाऱ्या पिंपळवृक्षाच्या फांदीवरील फुटव्याच्या वेगवेगळ्या रंगांच्या पानांचे
छायाचित्र आहे. ते अतिशय समर्पक आहे. पुस्तकमार्केट प्रकाशन, पुणे या ग्लोबल प्रकाशन संस्थेने प्रकाशित केलेला आणि प्रशांत पब्लिकेशन्सने पुनर्मुद्रित केलेला प्रस्तुत काव्यसंग्रह अतिशय दर्जेदार आहे.

**असहमतीचे रंग**
**कवी अशोक पळवेकर मोबा 9579587895**
**पुस्तकमार्केट प्रकाशन**
**पुष्ठ 204 किंमत 200/-**

# राजमाता आहिल्यादेवी होळकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** येथील पुण्यश्लोक राजमाता आहिल्यादेवी होळकर यांच्या स्मारक, पूर्णाकृती पुतळा अनावरण व लोकार्पण सोहळा मंगळवार, दि. ३० मे रोजी कांचनवाडी, पैठण रोड येथे प्रसिद्ध उद्योजक आणि छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्थेचे सचिव पद्माकरकाका मुळे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून माजी खासदार चंद्रकांत खैरे, माजी आमदार किशनचंद तनवणी, माजी महापौर नंदकुमार घोडेले, छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्थेचे प्रशासकिय अधिकारी डॉ. श्रीकांत देशमुख, डॉ. सुभाष भोयर, डॉ. उल्हास शिंदे, डॉ. गणेश डोंगरे, संजय अंबादास पाटील आदी मान्यवर आणि पंच कोर्शितील प्रचंड जनसमुदाय उपस्थित होता. मान्यवरांचा सत्कार पारंपरिक पद्धतीने घोंगडी, काठी आणि कपाळी भंडारा लावून करण्यात आला. पुतळ्याचे अनावरण आणि पूजन झाल्यानंतर रंगीबेरंगी शोभेची दारू, आतषबाजी आणि फटाक्याने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. या कार्यक्रमासाठी विशेष सहकार्य जनार्दन पाटील कांबळे ( जेष्ठ समाज



सेवक ) आणि विमलताई जनार्दन कांबळे ( सभापती तथा नगरसेविका ) यांचे लाभले. या भव्यदिव्य कार्यक्रमाचे आयोजन मल्हार साम्राज्य ग्रुप, जय मल्हार मित्र मंडळ, कांचनवाडी, पैठण रोड, छत्रपती संभाजीनगर यांनी केले होते.

# अजिंक्य जाधव यांचा पुस्तक वाटप करून वाढदिवस साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**घनसावंगी :** अजिंक्य क्रांती फाउंडेशनचे संस्थापक अजिंक्य भाऊ जाधव यांच्या वाढदिवसानिमित्त अजिंक्य फाउंडेशनचे प्रदेशाध्यक्ष तथा जालना जिल्हा अध्यक्ष समाधान काळुंखे उपाध्यक्ष शुभम बोबडे यांनी अभ्यासू विद्यार्थ्यांना त्यांच्या घरोघरी जाऊन "मैं हे विश्वास " हे विश्वास नागरे पाटील यांचे पुस्तक वाटप करून वाढदिवस साजरा करण्यात आला पुस्तक वाचल्याने मन आणि मस्तक घडते मन आणि मस्तक घडल्याने कोणापुढे नमस्तक होण्याची गरज पडत नाही. आज विद्यार्थी वाचनापासून दूर होत आहे . त्यांची वाचन क्षमता वाढावी व इतर व्यसनापासून बाजूला राहावे म्हणून त्यांना पुस्तकाची वाटप करून वाढदिवस साजरा केला. भविष्य काळात वेगवेगळ्या नामांकित व्यक्तिमत्त्वाचे प्रेरणादायी पुस्तके वाटप करण्याचे संकल्प आम्ही आमच्या अजिंक्य फाउंडेशन च्या वतीने वाढदिवसानिमित्त केलेला असल्याचे मत फाउंडेशन चे प्रदेशाध्यक्ष अजिंक्य भाऊ साळुंखे यांनी व्यक्त केले...
अजिंक्य जाधव यांचा निमित्त पुस्तक वाटप करून आगळ्यावेगळ्या पद्धतीने वाढदिवस साजरा करण्यात आला.







# निकिता डेरेची भारतीय नौसेनेत निवड

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील वडोद बाजार येथील मुलगी वयाच्या 18 वया वर्षी भारतीय नौसेना यात सिनियर सेक्रेटरी रिकृत ( एस एस आर. )ssr या पदी निवड झाली आहे. अशोक डेरे यांची कन्या निकीता अशोक डेरे हिने हलाखीच्या परिस्थिती शिक्षण घेवून भारतीय नोसेनेत यश मिळवले अशोक डेरे हे अल्पभूधारक शेतकरी असून आपली उपजीविका भागविण्यासाठी ते वाहन चालवतात या हलाखीच्या परिस्थितीत ही त्यांनी मुलीच्या शिक्षणासाठी मदत केली व तिच्या प्रयत्नाला यश प्राप्त झाले निकिताच्या लहानपणी आईचे काही दिवसापूर्वी आकस्मित निधन झाले होते. गरीब कुटुंबातील मुलगी भारतीय नोसेनेत



निवड झाल्याने वडोद बाजार येथील पहिली महिला नो सैनेत दाखल होणार आहे तिच्या यश बद्दल तिचे सर्वत्र कोतुक होत आहे तिच्या नि वडीबद्दल अशोक डेरे यांच्या वर्ग मित्रांनी निकिताच्या व आई वडील व तिचा सत्कार करण्यात आला सावत्र आईने याप्रसंगी आजिनाथ वाघ ,माणिक मस्के, विलास काटकर ,डॉ इमरान खान डॉ.गोरख पारखे, अशोक डेरे, मुरली लहाने ,मजहर शेख , फिरोज शेख ,कृष्णा लहाने, भिकन मंदाडे ,गजानन मंदाडे ,मोहसीन खान ,लक्ष्मण काटकर ,दिगंबर तुपे पांडुरंग तुपे ,साळूबा कोलते, गणपत कोलते , विष्णू बेडके, संजय तुपे, रज्जू शेख हरिदास वाघ उत्तम राठोड शंकर गुंजाळ राजू कबाडे सरिता वायकोस सुरेखा वाघ, प्रयाग रोठे सविता शिंदे सुवर्णा गायके उपस्थित होते.

# दिलीप वाघ यांच्या संयोजनाने सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** महानगरपालिकेतील काही सफाई कर्मचारी यांची सेवानिवृत्ती झाली त्या अनुषंगाने कर्मचारी युनियन अध्यक्ष दिलीप वाघ यांच्या माध्यमातून सेवानिवृत्त कर्मचारी सुमनबाई अहिरे, मथुरा शिरसाट, निर्मलाबाई पगारे, लक्ष्मीबाई दाणे, रंजना गोयर, भारती पवार या सर्व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा अधिकाऱ्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या सत्कार समारंभाच्या वेळेस सेवानिवृत्त कर्मचारी व त्यांचा संपूर्ण परिवार या ठिकाणी उपस्थित होते. या ठिकाणी कर्मचारी युनियन अध्यक्ष दिलीप वाघ म्हणाले की कर्मचाऱ्यांचे कुठलेही प्रश्न असो अतिरिक्त आयुक्त व उपायुक्त हे नेहमी कर्मचाऱ्यांचे प्रश्न सोडवत असतात. व या ठिकाणी उपस्थित उपआयुक्त संगीता नांदुरकर मॅडम यांनी सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या व पुढील आयुष्य कसे जगावे यासाठी सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना संदेश दिला. या ठिकाणी नांदुरकर मॅडम असे म्हणाले की शेवटचा दिवस हा गोड व्हावा यासाठी आपण हा चांगला कार्यक्रम आयोजित केला आहे महिला म्हणून काम करत असताना अनेक कसरत करावी लागते तेव्हा आपण कोणाची आई, सून, बहीण व सर्व नात्यामधून आपण सामोरे जात असतो हे सर्व कसरत करत असताना आपल्याला नोकरीही सांभाळायचे असते व सर्व परिवाराला सांभाळताना तरीसुद्धा आपण आपले काम इमानदारीने करत असतो आजच्या सर्व सेवानिवृत्त महिलांनी एक संकल्प करा की आज पासून आपण स्वतःसाठी वेळ देऊ व रोज आपल्या स्वतःसाठी एक तास व्यायामासाठी देऊ किंवा पायी चालत जाऊ त्यामुळे आपले आयुष्य अजून वाढेल व आपल्या परिवारासाठी इतर आयुष्य वेळ देता येईल. त्यासाठी आपण त्या वयात कुठलेही व्यसन न करता आयुष्य सरळ जगावे जेणेकरून आपल्यामुळे आपल्या परिवाराला त्रास होऊ नये व आपल्यालाही त्रास होऊ नये अशाप्रकारे उपायुक्त यांनी सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना महत्त्वाचा संदेश दिला. या ठिकाणी उपस्थित कामगार युनियनचे अध्यक्ष दिलीप वाघ, अतिरिक्त उपायुक्त कापडणीस साहेब, उपआयुक्त संगीता नांदुरकर, व इतर कर्मचारी उपस्थित होते.



# वीज पुरवठा खंडित; महावितरणचे दुर्लक्ष

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** ( ताः खुलताबाद ) येथील एकता नगर वसाहती मधील विद्युत वाहिनी तारांचे झाडाच्या फांद्यांची पंधरा ते वीस दिवसांपासून पार्किंग होत असल्याने वारंवार विद्युत पुरवठा खंडित होऊन टीव्ही संच पंखे, फ्रिज, बल्ब जळून निकामी होत असल्याने दररोज आर्थिक नुकसान होत आहे. आतापर्यंत तीन ग्राहकांचे घरातील टीव्ही संच रेणुका उप हारगृहाचे दोन फ्रिज अनेकांचे पंखे विजेचे बल्ब घरातील वीजपुरवठा वारंवार खंडित होऊन कमी अधिक दाबाने कुलर बंद पडणे बिघडणे पंखे बंद पडणे विद्युत बल्ब जळणे व घरगुती वापरातील विद्युत उपकरणांचे बिघाडणे नुकसान होणे एवढेच नव्हे तर रात्रीचे वेळी गल्लीतील खांबावरील दिवे देखील लुकलुक करून बंद पडणे व अंधाराचे साम्राज्य असणे अशा समस्यांना सामोरे जावे लागते. या भागात व गावासाठी महिला वायरमन ची नियुक्ती असून त्या योग्य त्या दखल घेत नाही त्यांचे कडे अनेकांनी तक्रार व अडचणी कळवूनही दुर्लक्ष होत असल्याने वीज ग्राहकांना अडचणींना सामोरे जावे लागते. महिला वायरमन असल्याने खांबावरील दुरुस्तीकडे दुर्लक्ष होऊन अनेक ग्राहकांना रोजंदारी सारखे दुसऱ्याकडून काम करून घ्यावे लागते वीज वितरण कार्यालयाने याची दखल घेऊन वीज वाहिनी तारांची दुरुस्ती व पुरुष वायरमन ची नेमणूक करावी अशी ग्राहकांची मागणी आहे.

# जलयुक्त शिवार योजनेत पंधरा गावांचा समावेश

आधुनिक केसरी न्यूज

**शेवगाव :** उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी २०१४ मध्ये सत्तेत आल्यानंतर जलयुक्त शिवार ही महत्वकांक्षी योजना सुरू केली होती, या योजनेचे फलित म्हणून महाराष्ट्रातील अनेक गावे सुजलम सुफलम झाली. २०१९ मध्ये महाविकास आघाडी सरकार सत्तेवर आल्यानंतर ही महत्त्वाकांक्षी योजना बंद करून चौकशी लावण्यात आली होती. शिंदे फडणवीस सरकारने सदर योजना जलक्त शिवार टप्पा दोन चे माध्यमातून सुरू केली असून या लोकाभिमुख योजनेचा लाभ गावकऱ्यांनी घ्यावा, या योजनेअंतर्गत सध्या शेवगाव तालुक्यातील १५ गावांचा समावेश असल्याचे आमदार मोनिकाताई राजळे यांनी सांगितले.

शेवगाव येथे अर्थसंकल्प २०२३ लेखाशीर्ष २५/१५, जिल्हा नियोजन अंतर्गत २ कोटी १० लक्ष रुपयांच्या कामाचा शुभारंभ



आ. मोनिकाताई राजळे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी नितीनकाकडे, सरचिटणीस भीमराज सागडे, महिला आघाडी अध्यक्ष आशाताई गरड, सरपंच लताबाई तहकीक, उपसरपंच दत्तात्रय तहकीक, केदार पाटील, व्हा चेअरमन बंडू वैद्य, राजाभाऊ डमाळे, राजेंद्र पोपळघट, सुगंध खंडागळे, डॉ निलेश मंत्री, भाऊसाहेब मुरकुटे बंडू हागे, अंबादास ढाकणे पाटील, कालिदास ढाकणे, शिवाजी खेडकर, संजय खेडकर, भगवानराव तेलोरे, ज्ञानेश्वर चेमटे, अर्जुन ढाकणे, संदीप देशमुख, लक्ष्मण टासतोडे, गणेश तहकीक, अशोकराव माने राजेंद्र मराठे, अशोक खिळे, परमेश्वर जावळे, दत्तात्रय जाधव, बाबा सावळकर, सुदाम घुमरे, शेषराव घुमरे, नवनाथ शेलार, किरण शेलार दत्तू गंगे, आबासाहेब वैद्य, नवनाथ भवार तसेच सार्वजनिक बांधकाम उपअभियंता प्रल्हाद पाठक, अभियंता रामेश्वर राठोड, घुले तात्या आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी आमदार मोनिकाताई राजळे म्हणाल्या २०१४ साली जनसेवा करण्याचे भाग्य लाभल्यानंतर आपण फक्त मतदारसंघातील विकास कामावर भर दिला आहे. शासनाच्या माध्यमातून वाडी वस्तीला जोडणारे रस्ते, मुख्य रस्ते, जलसंधारणाची कामे, विद्युत कामे, पुनर्वसन कामे, दलित वस्तीची कामे, तांडा सुधार योजनेअंतर्गतची कामे करता आल्याचे समाधान त्यांनी व्यक्त केले. सूत्रसंचालन अंबादास ढाकणे यांनी केले.






# कन्नडमध्ये पाण्यासाठी नागरिक हैराण

## माजी नगराध्यक्षांची गाडी धुण्यासाठी मुबलक पाणी

आधुनिक केसरी न्यूज



**कन्नड :** शहरात प्रत्येक प्रभागात 8 ते 10 दिवसांनी पाणी पुरवठा होत आहे. नगर परिषदवर प्रशासक मुख्य अधिकारी भोंबे यांच्याकडे सुत्रे आहेत.कन्नड शहरातील पाणी फिल्टर येथे खाजगीगाडी नंबर MH20 EY 6575 ही माजी नगर अध्यक्ष संतोष कोल्हे यांची गाडी रोज शाम्पू लावून धुतली जाते व पाण्याची नासाडी होते. मात्र आपण गप्प आहोत, असा आरोप उद्योजक मनोज पवार यांच्या कार्यर्त्यांकडून होत आहे. खरच नगर परिषद प्रशासन किती मेहरबान आहे, हे या ठिकानी दिसून येत आहे. याचा व्हिडीओदेखील सोशल मीडीयावर दिसून येत आहे. मात्र आपली हालचाल मात्र काहीच दिसुन येत नाही. पाणी पुरवठा निरिक्षक व त्यांचे सहकारी यांना याची काळजी नसून लाचारी कुणाची व कशासाठी करत आहात. असा प्रश्न या ठिकानी उपस्थित होताना दिसून येत आहे. यापुढे असे सुरु राहिल्यास कन्नड शहरातील सर्व नागरिकांना आम्ही रस्त्यावर उतरणार असे निवेदन मुख्य अधिकारी नंदकिशोर भोंबे यांना देण्यात आले आहे. आपली 4 चाकी, 2 चाकी, गाडया ह्या वाशिंग करण्यासाठी नगर परिषदचे पाणी फिल्टर प्लांट येथे पाण्याची नासाडी करत आहे व शहरातील नागरीक मात्र थेंब न थेंब पाणी जपुन वापरत आहे. यावर आपण याची लवकरात लवकर चौकशी करावी, अन्यथा मुख्याधिकारी यांना सादर केलेला व्हिडीओ जिल्हाअधिकारी व मंत्रालयात सादर करण्यात येईल. वरिष्ठाच्या कार्यालयात कन्नड नगर परिषद येथे शासकीय वाशिंग सेंटर चालू करण्याची मागणी करण्यात येईल, असेही निवेदनात म्हटले आहे. अश्या बेकायदेशीर नगर परीषदच्या पाणी फील्टरवर गाड्या धुवून वाशिंग सेंटर सुरू करून नगर परिषदेचे माजी नगर अध्यक्ष व माजी नगर सेवक यांना आपण आजपण सत्तेत आहोत, असे वाटत आहे. असेच सुरू राहीले तर सदरील गाड्या यापुढे वाशिंगसाठी आल्यास याला जबाबदार पाणी पुरवठा विभाग व कर्मचारी असणार आहे. कन्नड शहरातील खाजगी स्वर्गरथ पाणी फिल्टर प्लांटवर उभा करू नये त्याची जागा पाणी फिल्टर प्लांट वर नसून स्वर्गरथासाठी स्मशानभुमी येथे मुबलक जागा आहे. इतर बाबीचे निवेदन उदयोजक मनोज पवार यांच्या मित्र मंडळाने मुख्य अधिकारी नंदकिशोर भोंबे यांना दिले आहे. या निवेदनावर मनोज देशमुख ,पवन ठाकुर, सोमनाथ दाभाडे ,आशोक वाहुळ, सिध्दार्थ निकाळजे, योगेश त्रिभवन, संदिप घोंगटे ,दिपक कुमावत ,कचरू अव्हाळे, संदिप नरवडे, संतोष पवार, निलेश शेलार ,बंटी जाधव, शंकर राऊत, किशोर पांडव, राहुल चव्हाण, राजु गजलेश्वर, राहुल पवार, अक्षय केवट यांच्या सह्या आहेत.

# सफाई कामगारांनी जाळल्या तंबाखू पुड्या

आधुनिक केसरी न्यूज



**वैजापूर :** तंबाखूमध्ये विविध प्रकारचे घातक रासायनिक पदार्थ असतात ,तंबाखू व चुना मिश्रित पदार्थ सेवन केल्याने तसेच विडी, सिगारेट,ओढल्याने,तंबाखू चुना चघकळल्याने तोंडाचे आजार, घशाचा कॅन्सर, अन्ननलिका कॅन्सर,पोटाचा कॅन्सर,आतड्याचे आजार होतात ,तंबाखू खाणे म्हणजे साक्षात मृत्यू ला कवटाळूने होय असे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्ते तथा स्वच्छता दूत धोंडीरामसिह राजपूत यांनी"जागतिक तंबाखू सेवन विरोधी दिना "निमित्त बुधवार( ता,३१,मे )रोजी पालिकेच्या स्वच्छता निरीक्षक कार्यालयात सकाळी साडे सहा वाजता जमलेल्या,मजूर,कामगार,व सफाई कामगार समोर बोलताना केले,त्यांनी व कामगार तथा मजुरांची तंबाखू पुडी, व चुना पुडीची अक्षरशः होळी केली व आजपासून आम्ही तंबाखू खाणार नाही व इतरांनाही खाऊ देणार नाही अशी शपथ घेतली, या प्रसंगी स्वच्छता निरीक्षक प्रमोद निकाळे, सहायक रमेश त्रिभुवन,कैलास त्रिभुवन,यांनी सहभाग नोंदविला तर शेख अहमद,राहुल बनकर,राजू साकला,बिष्णू आलूले,चेतन निखाडे, संजय त्रिभुवन, प्रथमेश त्रिभुवन,व मजूर तथा सफाई कामगार यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# बोरी अडगाव येथे सशस्त्र दरोडा!

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** खामगाव तालुक्यातील बोरी अडगाव नजीकच्या शेतात राहणाऱ्या शेतकऱ्याच्या घरी आठ ते दहाजणांनी सशस्त्र दरोडा टाकल्याची घटना मंगळवारी मध्यरात्रीच्या सुमारास घडली. यावेळी यामध्ये चोरट्यांनी लाठ्या, लोखंडी पाईप आणि चाकूने वार केल्याने महिलांसह चौघेजण जखमी झाले. लाखाचा ऐवज घेऊन आरोपी पसार झाले. जखमींवर खामगाव उप जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार सुरू आहे. गौरव मारुती तायडे कुटुंबासह बाळापूर मार्गावर गावापासून दोन किलोमिटर अंतरावर शेतामध्ये राहतात. मध्यरात्रीच्या आसपास आठ ते दहा चोरट्यांनी हातामध्ये काठ्या, चाकू व इतर साहित्य घेऊन घरामध्ये प्रवेश केला. तसेच समोर आला त्याला मारहाण केली. गौरव आणि त्याच्या भावाने विरोध केला असता चोरट्याने दोघांसह घरातील महिलांनाही मारहाण केली.



# शासकीय डिजिटल ग्रंथालयात अहिल्याबाई होळकर यांची जयंती

आधुनिक केसरी न्यूज

**घनसावंगी :** शासकीय डिजिटल ग्रंथालय घनसावंगी येथे अहिल्यादेवी होळकर यांची जयंती साजरी करण्यात आली यावेळी यूट्यूब चैनल चे जनमानस श्री काळे सर व ग्रंथालयीन कर्मचारी राजेंद्र पगारे यांनी पुष्पहार अर्पण केला यावेळी विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या हजर होते. जयेश होसुरकर शुभम डांगे ,रोहिणी धबडकर, सारिका चांदर ,बोरकर रामेश्वर, पवार विकास ,शेख अलीम ,अरबाज शेख, पवार सुधाकर, राठोड सुरज, अनिल पवार ,विनोद ढेकळे ,सह आदी विद्यार्थ्यी उपस्थित होते.

# ब्रह्मसखी महिला वधुवर मंडळातर्फे थेटभेट उपक्रम

आधुनिक केसरी न्यूज



**छत्रपती संभाजीनगर :** ब्रह्मसखी ब्राह्मण महिला वधुवर मंडळतर्फे वधू-वरांसाठी दि. 27 व 28 मे रोजी द जैन इंटरनॅशनल स्कुल येथे थेटभेट उपक्रम संपन्न झाला. ब्रह्मसखी मंडळाची सुरूवात प्रथम WhatsApp वर झाली. ब्राह्मण समाजासाठी आपण काहीतरी काम करावे या धरतीवर ब्रह्मसखी मंडळाची सुरूवात झाली ते केवळ ब्राह्मण समाजाला याचा उपयोग व्हावा म्हणूनचं. मागील चार वर्षांपासून सुरू असलेले हे वधुवर मंडळ यशस्वीपणे वाटचाल करत आहे. यामधे सहा हजार पालकांचा समावेश आहे. नुकतेच पुणे येथे 2 एप्रिल रोजी 250 मुलामुलींचे गेट-टू-गेदर घेण्यात आले. पालकांच्या मागणीनुसार संभाजीनगर मधे उपक्रम घेण्याच्या इच्छेचा विचार केला आणि 27/28 मे 2023 या दोन दिवशी मुलामुलींसाठी "थेटभेट" हा उपक्रम घेण्यात आला. यामधे सर्वच वयोगटातील मुलामुलींचा सहभाग होता. यामधे घटस्फोटीत मुलेमुलीही होती. या उपक्रमासाठी डॉ सौ.मनिषा टाकळकर व डॉ सौ. प्रिया भाले या प्रमुख पाहुणे म्हणून लाभले. प्रथम ब्रह्मसखी टीम यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. समाजाप्रती बांधिलकी आणि ब्राह्मण समाजाची आजची गरज लक्षात घेऊन ब्रह्मसखी टीम यासाठी मनापासून काम करत आहे, याचे फारच कौतुक करायला हवे. महत्वाचे म्हणजे 4 जुन रविवार रोजी खास पालकांसाठी त्यांनी माननीय श्री चारूदत्त आफळे बुवांचे समुपदेशन संभाजीनगर IMA Hall येथे आयोजित केले आहे. हल्ली मेळाव्यासाठी उपस्थित रहाणारी मुलेमुली कमी आणि पालकचं जास्त असतात, याचाच विचार करून ब्रह्मसखीने फक्त मुलामुलींची समोरासमोर भेट घडवून आणण्यासाठी प्रयत्न केले आणि स्वतः ब्रह्मसखीच्या चार संचालिकांनी यांना मार्गदर्शन केले. ही आगळीवेगळी मानसिकता लक्षात घेऊन ब्रह्मसखीच्या या विचारांना खरोखर विनम्र अभिवादन करावे. थेटभेट उपक्रमासाठी मुलांची संख्या 500 तर मुलींची संख्या 250 होती. ही बाब खरोखर वाखाणण्याजोगी आहे. या कार्यक्रमाचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे सुव्यवस्थित शिस्तबद्ध आयोजन, नियोजन आणि मुलामुलींचा भरपूर प्रतिसाद या उपक्रमासाठी होता. ब्रह्मसखी टीमचे प्रमुख चार खांब सौ.नंदिनी ओपळकर, सौ.ज्योती कानोले, सौ.तृप्ती कुलकर्णी, सौ.गीता सराफ हे आहेत यांनी अल्पावधीतच उत्कृष्ट कार्य करून अनेक पालकांचे विवाह विषयक प्रश्न सोडविले आहेत व त्यांना योग्य मार्गदर्शन केले आहे.

# जिजाभाऊ मिसाळ यांना धनगर समाजभूषण पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** अहिल्यादेवी होळकर जन्मोत्सव व धनगर माझा न्युज पोर्टल व साप्ताहिकाच्या ८ व्या वर्धापन दिनानिमित्त पुणे येथे आयोजित कार्यक्रमात, धनगर समाजासाठी उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल, जिजाभाऊ बाळाजी मिसाळ ग्रामविकास अधिकारी पंचायत समिती पैठण रा. आपेगाव ता.पैठण यांना राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. "समाजभूषण" पुरस्कार माजी मंत्री दत्ता मामा भरणे, माजी मंत्री प्रा.राम शिंदे , माजी खासदार विकास महात्मे , पट्टनकडोलीचे मुख्य भाकणुककार फरांदे महाराज, व ग गणेश महाराज वाघ, माजी आमदार पोपटराव गावडे, माजी आमदार प्रकाश अण्णा शेंडगे, पोलीस उप आयुक्त रुक्मिणी गलांडे , उज्वला हाके या प्रमुख मान्यवर हस्ते व धनगर माझाचे धनंजय ताणले विवेक बिडगर, बाबुराव बनसोडे यांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आला. यापूर्वीही त्यांना ग्रामविकासामध्ये उत्कृष्ट कार्याबद्दल जिल्हास्तरीय आदर्श ग्रामसेवक पुरस्काराने गौरविण्यात आलेले आहे, जीजाभाऊ मिसाळ यांनी औरंगाबाद जिल्हा ग्रामसेवकांची सहकारी पतसंस्थाचे अध्यक्ष पद देखील भूषवलेले आहे. जिजाभाऊ मिसाळ यांना समाज भूषण पुरस्कार मिळाल्याबद्दल शिवाजी वने, दशरथ खराद, सुनील इंगळे, अरविंद चव्हाण, ईश्वर सोमवंशी, कैलास नलावडे, वसंत इंगळे, भीमराव गाढे, किशोर निकम, जे. जी. एलपलवड, एस. आर. इंगळे, कनिष्ठ सहाय्यक मथुरा बडे, शोभा शिंदे, वैशाली साळवे, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक अविनाश चपडे, बालानगर येथील मिठाईचे प्रसिद्ध व्यापारी संभाजी चव्हाण, सेवानिवृत्त कनिष्ठ प्रशासन अधिकारी बीबी हाके , जगदीश वीर, ज्ञानेश्वर वाघमारे आदींनी त्यांचे समाज भूषण पुरस्कार प्राप्त बद्दल अभिनंदन केले.

# टेंभू उपसा योजनेचे पाणी वेळेत न सोडल्याने नुकसान

आधुनिक केसरी न्यूज

**सांगोला :** माणनदीमध्ये टेंभू उपसा सिंचन योजनेचे पाणी वेळेत न सोडल्याने नदीकाठच्या गावांना पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली आहे तर शेतीतील उभी पिके करपून जाऊ लागले आहेत माणनदी मध्ये टेंभू उपसा सिंचन योजनेचे पाणी त्वरित सोडावे अशी मागणी शेतकरी व ग्रामस्थांमधून केली जात आहे.

सांगोला तालुक्यात जनतेला पिण्याच्या पाण्यासाठी व शेतीच्या पाण्यासाठी वरदायी ठरलेली माणनदी आहे. तालुक्यामध्ये गेल्या तीन वर्षात चांगला पाऊस पडल्याने ही नदी वाहती झाली होती तर या नदीवरील बंधारे पाण्याने भरले होते पण वेळेत या बंधाऱ्यांची लिकेज न काढल्याने पाणी वाया गेले सध्या या नदीवरील सर्व बंधारे कोरडे ठणठणीत पडले आहेत तर नदीपात्रातील वाळू मधील ही पाणी पूर्ण पणे आटले आहे यामुळे या नदीकाठच्या गावांना पिण्याच्या पाण्याचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे गेल्या दोन वर्षात पाऊस पडल्यावर त्या पाण्यामध्ये टेंभू उपसा सिंचन योजनेचे पाणी सोडले होते यामुळे यावर्षीही टेंभू उपसा सिंचन योजनेचे पाणी येईल अशी आशा होती पण पावसाच्या पाण्यातच टेंभू उपसा सिंचन योजनेचे पाणी सोडले या पाण्याचे पैसे भरा आम्ही पाणी सोडतो अशी भूमिका टेंभू उपसा सिंचन योजनेच्या अधिकाऱ्यांनी घेतल्याने माणनदीला पाणी येण्यास उशीर होत आहे सध्या माणनदीपात्रामध्ये पाणीच नसल्याने टेंभू योजनेचे पाणी येईल या आशेने शेतकऱ्यांनी उन्हाळी कापूस कडवळ ऊस मका ही पिके घेतली पण टेंभु योजनेचे पाणी आले नाही यामुळे ही पिके पाण्याअभावी करपून जाऊ लागली आहेत तसेच पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होऊ लागले आहे टेंभू उपसा सिंचन योजनेचे पाणी तात्काळ सोडावे व माण नदीवरील कोल्हापूर पद्धतीचे बंधारे भरून द्यावेत अशी मागणी शेतकरी व ग्रामस्यामधून केली जात आहे .



माणनदीमध्ये पाणी उपलब्ध नसल्याने हाता तोंडास आलेली पिके करपून जाऊ लागली आहेत पिण्याच्या पाण्याची मोठी टंचाई निर्माण झाली आहे तात्काळ पाणी सोडावे . **भागवत शिंदे, अकोला )**

गेल्या दोन वर्षात टेंभू उपसा सिंचन योजनेचे पाणी माणनदीत सोडले होते या पाण्याचे पावणेदोन कोटी थकबाकी संबंधित गावातील शेतकरी व ग्रामपंचायतकडे आहे ही थकबाकी भरून सहकार्य करावे तसेच माणनदीवरील नाझरे वाटंबरे या गावची पाण्याची मागणी आली आहे सरासरी एका बंधाऱ्याला पाच ते सहा लाख रुपये पाणीपट्टी भरावी म्हणजे माण नदीमध्ये पाणी सोडता येईल सध्या आटपाडी ( जि . सांगली ) येथे पाणी आली आहे दोन दिवसात माणनदीला पाणी सोडण्याची व्यवस्था करण्यात आली आहे पण शेतकऱ्यांनी व ग्रामस्थांनी पाणी पट्टी भरून सहकार्य करावे .

**सुशीलकुमार गायकवाड, उपविभागीय अभियंता टेंभू उपसा सिंचन योजना तासगाव)**



# जळगाव जामोद तालुक्याचे शासन आपल्या दारी शिबिर संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**सागरकुमार झनके**

**जळगाव जा :** महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून साकार झालेल्या शासन आपल्या दारी या उपक्रमांतर्गत जळगाव जामोद तालुक्याचे महाशिबिर दिनांक 30 मे 2023 रोजी येथील सांस्कृतिक भवन येथे घेण्यात आले. या महाशिबिराचे उद्घाटन जळगाव जामोद विधानसभा मतदारसंघाचे आमदार डॉ संजय कुटे यांनी केले. शासन आपल्या दारी या महाशिबिरामध्ये महसूल विभागामार्फत सातबारा, फेरफार, जातीचे दाखले, उत्पन्नाचे दाखले, अधिवास प्रमाणपत्र,संजय गांधी निराधार योजनेतील लाभार्थ्यांना प्रमाणपत्र, सलोखा योजनेतील लाभार्थ्यांना प्रमाणपत्र, रेशन कार्ड शेतकरी लाभार्थ्यांना पुरवठा विभागाअंतर्गत डीबीटी साठी फॉर्म भरून घेणे, आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना धनादेशाचे वितरण तसेच नैसर्गिक आपत्तीने बाधित झालेल्या कुटुंबांना धनादेशाचे वितरण अशा एकूण 5242 लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला. पंचायत समिती मार्फत प्रधानमंत्री आवास योजना,रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, रोजगार हमी योजना अंतर्गत गुरांचे गोठे, माझी कन्या भाग्यश्री योजना अश्या एकूण 569 लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला.तालुका कृषी अधिकारी कार्याकडून ट्रॅक्टरचे वाटप, कांदा चाळ अनुदान योजनेअंतर्गत लाभ वितरण व विविध प्रक्रिया उद्योगांना लाभ देणे असे एकूण 378 लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला. नगरपरिषद मार्फत प्रधानमंत्री आवास योजना, प्रधानमंत्री कर्ज योजना अंतर्गत एकूण 564 लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला.भारतीय स्टेट बँके मार्फत एकूण 151 शेतकऱ्यांना पीक कर्जाचे वितरण करण्यात आले. भूमी अभिलेख विभागामार्फत 1852 लाभार्थ्यांना स्वामित्व योजनेअंतर्गत सनदेचे वितरण करण्यात आले. असे एकूण 7785 लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला. सदरच्या शिबिरासाठी विविध विभागांचे एकूण 15 स्टॉल लावण्यात आले होते व त्यासाठी प्रत्येक विभागाने कर्मचाऱ्यांची नियुक्ती केलेली होती व त्यांच्या माध्यमातून सदरचा लाभ देण्यात आला. शिबिरासाठी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून जळगाव जामोद विधानसभा मतदारसंघाचे आमदार डॉ संजय कुटे हे उपस्थित होते.त्यांनी आपल्या उद्घाटनपर भाषणात सांगितले की शासन आपल्या दारी हा उपक्रम जनतेला तातडीने सेवा पुरविता याव्यात व त्यांना विविध कार्यालयात फेऱ्या माराव्या लागू नये यासाठी आवश्यक आहे. शासकीय अधिकारी व कर्मचारी यांनी फक्त चौकटीतच दिलेल्या वेळेत काम न करता जनतेसाठी आपला अधिकचा वेळ द्यावा व समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत शासनाच्या योजना पोचवाव्यात. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून शैलेश काळे उपविभागीय अधिकारी जळगाव जामोद हे उपस्थित होते.शिबिराचे स्वरूप कसे असेल या बाबत प्रास्ताविक तहसिलदार शीतल सोलाट यांनी केले. तसेच शिबिराच्या ठिकाणी तालुका प्रशासनाच्या वतीने नायब तहसीलदार गटविकास अधिकारी तालुका कृषी अधिकारी. मुख्याधिकारी, आगार व्यवस्थापक, ,तालुक्यातील सर्व मंडळ अधिकारी, तलाठी, ग्रामसेवक, कृषी सहाय्यक, आशा सेविका, अंगणवाडी सेविका व इतर सर्व विभागांचे क्षेत्रीय कर्मचारी उपस्थित होते.



# जनशक्ती शेतकरी संघटनेच्या छत्रपती संभाजीनगर शहर अध्यक्षपदी रमेश पाटील

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** दि 27 मे रोजी जनशक्ती शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष आदरणीय अतुल भाऊ खूपसे पाटील यांच्या आदेशानुसार छत्रपती संभाजीनगर व नाशिक जिल्हा संपर्क प्रमुख अनिल शेळके पाटील यांच्या हस्ते रमेश पाटील याची जनशक्ती शेतकरी संघटना छत्रपती संभाजीनगर शहर अध्यक्षपदी निवड करण्यात नियुक्ती पत्र देऊन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. संघटना वाढीसाठी छत्रपती संभाजीनगर शहरात सर्वसामान्यांचे व शेतकर्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी आपण जनशक्ती शेतकरी संघटनेच्या शहरामध्ये वार्ड तिथे शाखा स्थापन करुन सर्व सामान्यसाठी काम करावे, असे मार्गदर्शन केले.




# मुक्त विद्यापीठाने नवनाथ चव्हाण यांचा शब्द पाळला; विद्यार्थ्यांना न्याय मिळाला

आधुनिक केसरी न्यूज



**लोहा :** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ लोहा येथील केंद्रावर झालेल्या संयोजकाच्या हलगर्जीपणामुळे परीक्षा फीस भरूनही परीक्षेचे प्रवेश पत्र न मिळाल्यामुळे विद्यार्थ्यांवर अन्याय होत असल्याची ओरड होत होती. अशा गंभीर प्रकरणी जिल्हा नियोजन समितीचे माजी सदस्य तथा स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे सिनेट सदस्य नवनाथ रोहिदास चव्हाण यांना अनेक विद्यार्थ्यांनी साकडे घालत होत असलेल्या अन्यायाला न्याय मिळण्याची अपेक्षा बोलून दाखवली. अशावेळी सिनेट सदस्य नवनाथ चव्हाण यांनी विद्यार्थ्यांची हित लक्षात घेता संबंधित प्रकरणाची विभागीय केंद्र नांदेडचे डॉ. चंद्रकांत पवार उपकुलसचिव यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधून लोहा येथील मुक्त विद्यापीठाच्या केंद्रातील झालेल्या अन्यायकारक भूमिकेची उकल केली. संयोजकाच्या एका चुकीमुळे अनेक विद्यार्थ्यांचे नुकसान होईल,वर्ष वाया जाईल अशी व्यथा मांडली. नुकसान होणार नाही याची शंभर टक्के काळजी घेऊ आम्हाला तशी तक्रारही प्राप्त झालेली आहे. असे दूरध्वनीवरून संवाद साधत संबंधांनी तसा शब्दही दिला. सदर गंभीर प्रकरणाची यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक च्या कुलगुरूंनी तात्काळ दखल घेतली.डॉ. मोहन बी.के., वरिष्ठ शैक्षणिक सल्लागार डॉ. चंद्रकांत पवार, उपकुलसचिव यांनी आज दि. ( २९ ) मे रोजी प्रत्यक्ष महाविद्यालयास भेट दिली. प्राचार्य,विद्यार्थ्यास प्रत्यक्ष संवाद साधला. या प्रकरणाची सविस्तर माहिती विद्यापीठात सादर केली असता कुलगुरू संजीव सोनवणे यांनी प्रवेश न झालेल्या विद्यार्थ्यांचे प्रवेश दिनांक 6 जुन 2023 पर्यंत आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून निश्चित करण्यात यावेत तसेच विद्यार्थ्यांना माहे नोव्हेंबर डिसेंबर २०२३ मध्ये होणाऱ्या पुरवणी परीक्षेला बसता येईल यामुळे शैक्षणिक नुकसान होणार नाही असा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताचा निर्णय घेतला. यामुळे नवनाथ चव्हाण यांच्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत केलेल्या पाठपुराव्यामुळे, समंजसपणे घेतलेल्या भूमिकेमुळे विद्यार्थ्यांचे होणारे नुकसान टळले असल्याने अनेक विद्यार्थ्यांनी मोकळा श्वास घेत विद्यापीठ प्रशासनाचे व नवनाथ रोहिदास चव्हाण यांचे आभार मानले.

# रमेश माळी यांचे आरोप बिनबुडाचे

## त्यांना मला बडतर्फ करण्यासाठी प्रस्ताव पाठविण्याचा अधिकार नाही : राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष प्रभाकर पवार

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** राष्ट्रवादी काँग्रेसचे हंगामी लोहा तालुकाध्यक्ष यांनी माझ्यावर केलेले आरोप बिनबुडाचे असुन मला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातून काढण्याचा अधिकार त्यांना नाही. मी एक राष्ट्रवादीचा निष्ठावंत कार्यकर्ता पदाधिकारी असून चार पक्ष बदलून नुकतेच काल परवा पक्षात आलेल्या लोकांना नाव घेऊन मोठ मी करणार नाही असा नाव न घेता लोहा तालुका राष्ट्रवादी काँग्रेसचे लोहा तालुकाध्यक्ष रमेश माळी यांना लोहा शहराध्यक्ष प्रा. प्रभाकर पवार यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले. पुढे म्हणाले की,शहरासह तालुक्यातील मालाकोली, चोंडी घोटका, लिंबोटी, आदी ठिकाणी पक्ष बांधणीचे काम मोठ्या उमेदीने करून तत्कालीन तालुकाध्यक्ष ना मोठे सहकार्य केले. आजही तुम्ही सदरील राष्ट्रवादी काँग्रेसच्या बूथप्रमुखांना संपर्क करून विचारू शकता प्रभाकर पवार यांनी



कित्येक खेडेपाडे पिंजली, पक्ष बांधणी केली, बुथ कमिट्याची नियुक्ती केल्या. मी एक निष्ठावंत राष्ट्रवादीचा मानणारा कार्यकर्ता पदाधिकारी असून काल परवा पक्षात आलेल्या लोकांना नाव घेऊन मोठ करणार नाही. मी एक उच्चशिक्षित तरुण ज्यांनी देशाचे नेतृत्व केलं अशा राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद चंद्रजी पवार साहेबांच्या विचाराने भारावून गेलेला, पक्षाच्या वरिष्ठां चे आदेश प्रमाण म्हणून पक्षाला मोठी ताकद दिलेला सामान्य पदाधिकारी कार्यकर्ता आहे. मला पक्षाची घटना माहीत असून, जाणते राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या व भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना आदर्श मानून यांच्या विचाराने समाजातील अठरापगड जाती धर्माला पूरक असे विचार जोपासणारा व तमाम सर्व धर्मीयांना सोबत घेऊन चालणारा एक प्रामाणिक कार्यकर्ता आहे. माझा कोणताही अवैद्य धंदा व्यवसाय नसून मी शिक्षकी पेशातला एक इमानदार, प्रामाणिक, निष्ठावंत असल्याचे पक्षाचे जिल्हाध्यक्ष हरिहरराव भोसीकर व वरिष्ठांना माहित आहे. माझ्यासोबत अजूनही माझे जुने सहकारी माजी पंचायत समिती सदस्य चांदणे, विलास चुडावकर,घोरबांडसह अन्य मंडळी सोबतीला असेल आम्ही सर्वजण मिळून पक्ष वाढीचे काम अजूनही करत आहोत.मी लोहयात पक्षात अगोदर पासून असल्याने लोहा तालुकाध्यक्ष पदावर माझा दावा होता . रमेश माळी हे अनेक पक्ष फिरुन आता राष्ट्रवादी काँग्रेस मध्ये आले आहेत व ते येथे राहतील म्हणून भरवसा नाही.मी तालुकाध्यक्ष पदाचा दावेदार असल्याने उपऱ्यांना तालुकाध्यक्ष केले हे योग्य नाही. त्यामुळे मी भावनेच्या भरात सोशल मीडियावर पोस्ट टाकून माझी नाराजी व्यक्त केली होती. मी राष्ट्रवादीतच आहे व राष्ट्रवादी काँग्रेस मध्येच राहणार आहे. जर राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष हरीहर भोसीकर यांनी आमच्यात समन्वय केल्यास ही जमेल कुणी पक्षात राहत असेल पक्षवाढीसाठी आपण त्यांचे स्वागत करूत असे प्रभाकर पवार म्हणाले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी पंचायत समिती सदस्य माधव चांदणे उपस्थित होते.

# महापालिकेच्या सेवा शर्ती नियमांना शासनाकडून मंजुरी

## पदोन्नती आणि सेवा भरतीचा मार्ग मोकळा

आधुनिक केसरी न्यूज

**सांगली :** महापालिकेच्या सेवा शर्ती नियमांना अखेर शासनाकडून मंजुरी देण्यात आली. याबाबतचा अध्यादेश आज शासनाकडून प्राप्त झाला. सेवा शर्ती नियमांना मंजुरी मिळाल्याने आता महापालिकेत कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांची पदोन्नती आणि उर्वरित जागांसाठी सरळ सेवा भरतीचा मार्ग मोकळा झाला आहे अशी माहिती मनपाच्या गटनेत्या भारती दिगडे यांनी पत्रकार बैठकीत दिली. यासाठी पालकमंत्री सुरेश खाडे, आमदार सुधीर गाडगीळ, महापौर दिग्विजय सूर्यवंशी, स्थायी सभापती धीरज सुर्यवंशी, भाजपा नेते शेखर इनामदार यांनी पाठपुरावा केल्याचेही भारती दिगडे यानी सांगितले. याबाबत भारती दिगडे म्हणाल्या की, सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेची 1998 साली स्थापना झाली. या 25 वर्षात महापालिकेचा आकृतीबंध आणि स्टाफ पॅटर्न मंजूर नव्हता. मागील वर्षभरात याबाबत पाठपुरावा केल्यानंतर शासनाकडून यापूर्वी आकृतीबंदाला परवानगी दिली होती. सध्या मनुषबळ कमी पडत होते. या बाबी विचारात घेऊन अंतिम आकृतीबंध यापूर्वी मंजूर आहे. तसेच आज महापालिकेच्या सेवा शर्ती नियमास मान्यता देण्यात आली. यामुळे आता महापालिकेच्या अंतर्गत पदोन्नती आणि उर्वरित जागांसाठी सरळ सेवाभरती करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. शासनाकडून आकृती बंदाला मंजुरी मिळाल्यामुळे आज सेवा शर्ती नियमांना मंजुरी देण्यात आली. आता यानंतर रोस्टर ( बिंदू नामावली ) तपासावी लागणार असून त्यानंतर महापालिकेच्या सेवेत कार्यरत असणाऱ्या कायम कर्मचाऱ्यांना अंतर्गत पदोन्नती दिली जाणार आहे त्यानंतर उर्वरित जागांसाठी सरळ सेवा भरती केली जाणार आहे. याची अमलबजाणी करताना सध्या कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांना कोणताही धक्का लागणार नाही याबाबत आमचे प्रयत्न असणार आहेत. तसेच समांतर आरक्षणाबाबत नियोजन करून शासनाकडून विहित आरक्षणाचा समावेश करून मगच सरळ सेवा भरती केली जाणार असल्याचेही भारती दिगडे यानी सांगितले.

महापालिकेला मंजूर पदे 2340 असून नवीन 1114 इतकी पदे मंजूर झाली आहेत अशी एकूण 3454 इतकी पदे शासनाकडून मंजूर करण्यात आली असून यापैकी नवीन 1114 पदामधून पदोन्नती दिली जाणार असून उर्वरित शिल्लक जागांसाठी सरळ सेवा भरती केली जाणार असल्याचेही भारती दिगडे यानी सांगितले. यावेळी आस्थापना अधिकारी चंद्रकांत आडके उपस्थित होते.

# उच्च माध्यमिक परीक्षेत कुणाल आवारे चारही शाखेत प्रथम

आधुनिक केसरी न्यूज



**निफाड :** येथील रहिवाशी व श्री छत्रपती शिवाजी विद्यालय, कोळपेवाडी उच्च माध्यमिक विद्यालयाचा विद्यार्थी कु.कुणाल किरण आवारे याने कला, वाणिज्य, विज्ञान व किमान कौशल्य या चारही शाखेत प्रथम क्रमांक पटकावला. विज्ञान शाखेचा १०० टक्के निकाल लागला असून आदित्य दिवाकर मोकळ ( ७१ ) प्रथम, प्रसाद बाळासाहेब चांडे ( ७०.८३ ) द्वितीय, गणेश शामराव लोहार ( ६५.८३ ) तृतीय, वाणिज्य शाखेचा १०० टक्के निकाल लागला असून तेजल अशोक खर्डे ( ७४.६५ ) प्रथम, ऋतुजा रोहिदास माळी ( ७२.८३ ) द्वितीय, आदेश देविदास ठाणगे ( ६९.८३ ) तृतीय, कला शाखेचा ८८.२३ टक्के निकाल लागला असून मुजाहिद समिर पटेल ( ६३.२ ) प्रथम, सुमित संजय अंभोरे ( ६२.७ ) द्वितीय, शुभम बाळासाहेब काकड ( ५९.७ ) तृतीय तर किमान कौशल्य शाखेचा निकाल ९१.९३ टक्के लागला असून कुणाल किरण आवारे ( ८० ) प्रथम, सुमित नानासाहेब कदम ( ७०.५ ) द्वितीय, कुणाल दीपक पवार ( ६८ ) याने तृतीय क्रमांक पटकावला. यशस्वी विद्यार्थ्यांना प्राचार्य पी.बी.चौरे, अविनाश शिंदे, आप्पासाहेब आगवन, बाळासाहेब गवळी, योगेश महामिने, दुधलमल सर, दळवी सर, कविता होन, निंबाळकर मॅडम, निरगुडे सर यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थ्यांचे आ.आशुतोष काळे यांनी अभिनंदन केले आहे.

# राजूर येथे सर्वरोगनिदान निदान शिबिर संपन्न; २१० रुग्णांची मोफत आरोग्य तपासणी

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीक्षेत्र राजूर :** भोकरदन तालुक्यातील श्रीक्षेत्र राजूर येथे रविवार रोजी मोफत सर्व रोग निदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. छत्रपती संभाजीनगर येथील डॉ. हेडगेवार रुग्णालय,डॉ.पवार हॉस्पिटल आणि राजमुद्रा फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने हे शिबीर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात राजूरसह परिसरातील विविध शारीरिक व्याधीग्रस्त रुग्णांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवून आपली आरोग्य तपासणी करून घेतली. या आरोग्य शिबिरात डॉ. हेडगेवार रुग्णालयाचे जनसंपर्क अधिकारी आप्पा कुलकर्णी, डॉ. मुकेश परमार, डॉ. वर्षा धोंडे,डॉ. सिद्धार्थ,डॉ.शीतल बाविस्कर,श्री.विकास होलाप, श्री. प्रवीण वाणी,डॉ. कैलास चौधरी,डॉ. योगेश मिसाळ, राजमुद्रा फाऊंडेश अध्यक्ष प्रा.बाळासाहेब बोराडे,पवार हॉस्पिटल संचालक डॉ.भाऊसाहेब पवार आदी जणांची प्रमुख उपस्थिती होती.



या शिबिरातून अनेक रुग्णांनी मोफत आरोग्य सेवेचा लाभ घेतला असून त्यामध्ये मेडीसिन ५०,सर्जरी २२,नेत्र विभाग ५८, बालरुग्ण १०, रेफर रुग्ण ३०,आरबीएस शुगर ४० अशा एकूण २१० रुग्णांची तज्ञ डॉक्टरांकडून तपासणी करून निदान करण्यात आले. यामध्ये मधुमेह, रक्तदाब, थायरॉईड, श्वसन विकार, अपेंडिक्स, हर्निया, मुळव्याध, मुतखडा, बालकांच्या शारीरिक,बौद्धिक, मानसिक वाढीबद्दलच्या समस्या,नेत्ररोग तपासणी, त्वचा रोग, यासारख्या समस्यांग्रस्त रुग्णांची मोफत तपासणी करून औषधीचे मोफत वितरण करण्यात आले. शिबिर यशस्वीतेसाठी जनार्दन पवार, निवृत्ती पवार, दत्ता शिंदे, ऋषिकेश निहाळ, दत्ता घायाळ, कृष्णा पवार, सुरेश निहाळ आदी जणांनी परिश्रम घेतले.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर